म.ग्रं.सं., वाचनालय शाखा, ठाणे.
विषय : नाटक
दा.क्र.: २०६५८

IRBK-0120658

मायबाप – महात्मा फुले
लेखक – स. पां. जोशी
प्रस्तावना– श्री. वि. स. पागे
महात्मा फुले स्मारक समितीचे
प्रकाशन द्वारा मानद सचिव
श्री. मुकुंदराव पाटील
जुना भाजी बजार, भायखळा,
मुंबई–४०० ०२७.

**किंमत १५ रुपये**

मान्यताप्राप्त जिल्हा व तालुका ग्रंथालयांना हे पुस्तक लेखी मागणी केली असता विनामूल्य समक्ष मिळेल. अगर पोष्टाने पाहिजे असेल तर ट. खर्च रुपया एक मनिऑर्डरने पाठवावा.

पत्ता– महात्मा फुले स्मारक समिती करिता श्री समर्थ प्रिंटींग प्रेस, स्टेशन रोड, ठाणे ४०० ६०१.

मायबाप

महात्मा फुले

Mayabap
Mahatma Phule
(Marathi Play)
D. R. M. 703 8–8–1983

S. P. Joshi
Editor Daily 'Sanmitra'
Thane 400 601.

मायबाप
महात्मा फुले
डी. आर. एम. ७०३ ८–८–१९८३
कॉपीराईट

लेखक- स. पां. जोशी
संपादक दैनिक 'सन्मित्र'
ठाणे ४०० ६०१.

प्रकाशन व वितरण सर्व हक्क
व २५ प्रयोगांचे हक्क
महात्मा फुले स्मारक समिती
द्वारा मानद सचिव श्री. मुकुंदराव पाटील
जुना भाजी बझार, भायखळा,
मुंबई ४०० ०२७.
यांजकडे स्वाधीन.

वाचनालय
नाटक
२०६५८
२१/१२/८८

# मायबाप

## महात्मा फुले

लेखक :

स. पां. जोशी

IRBK-0120658

महात्मा फुले स्मारक समिती

आवृत्ती पहिली

प्रति ३०००

दि. ६-११-१९८४

मुद्रक :-

श्री. विजय सखाराम जोशी
श्री समर्थ प्रिंटींग प्रेस,
ट्रेझरी ऑफिस समोर, ठाणे ४०० ६०१.

प्रकाशक :-

श्री. मुकुंदराव पाटील
मानद सचिव, महात्मा फुले स्मारक समिती,
जुना भाजी बझार, भायखळा,
मुंबई ४०० ०२७.

# महात्मा फुले स्मारक समितीचे अध्यक्ष
# मुख्यमंत्री श्री. वसंतराव पाटील यांचा अभिप्राय

महाराष्ट्राचे आद्य समाजसुधारक, स्त्री शिक्षणाचे उद्‌गाते आणि समाज परिवर्तनाचे शिल्पकार म्हणून आपण ज्यांचा अभिमानाने आणि गौरवाने उल्लेख करतो त्या महात्मा जोतिबा फुले आणि साध्वी सौ. सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर ठाण्याचे सन्मित्रकार श्री. स. पां. जोशी यांनी "मायबाप" ही सुंदर नाटयकृती निर्माण केली आहे.

आजवर आपण महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्या-संबंधीची माहिती लेख आणि ग्रंथांच्याद्वारे घेतली. पण "मायबाप" च्या रुपाने या पतिपत्नींच्या थोर कार्याचे यथार्थ दर्शन त्यांच्यावरील या पहिल्यावहिल्या नाटकामुळे घडणार आहे. अशी ही एक सुंदर नाटयकृती तयार केल्याबद्दल सन्मित्रकार श्री. जोशी धन्यवादास पात्र आहेत.

"मायबाप" च्या प्रकाशनाचे आणि नाटयप्रयोगाचे अधिकार श्री. जोशी यांनी मुंबईच्या महात्मा फुले स्मारक समितीकडे सुपूर्द केल्याचे समजून अतिशय आनंद वाटला. आता या नाटकाचे प्रयोग महात्मा फुले स्मारक समितीच्यावतीने महाराष्ट्रात ठिकठिकाणी सहकारी बँका, नगरपरिषदा, साखर कारखाने व अन्य सामाजिक नि सांस्कृतिक संस्थांद्वारे संपन्न होतील. ओघवती भाषा, अचूक नाटयप्रसंगांची निवड आणि फुले पतिपत्नींचे प्रभावी व्यक्तिचित्रण यामुळे "मायबाप" ही नाटयकृती रसिकमान्य होईल अशी अपेक्षा आहे.

आवृत्ती पहिली

प्रति ३०००

दि ६-११-१९८४

मुद्रक :-

श्री. विजय सखाराम जोशी

श्री समर्थ प्रिंटींग प्रेस,

ट्रेझरी ऑफिस समोर, ठाणे ४०० ६०१.

प्रकाशक :-

श्री. मुकुंदराव पाटील

मानद सचिव, महात्मा फुले स्मारक समिती,

जुना भाजी बझार, भायखळा,

मुंबई ४०० ०२७.

# महात्मा फुले स्मारक समितीचे अध्यक्ष मुख्यमंत्री श्री. वसंतराव पाटील यांचा अभिप्राय

महाराष्ट्राचे आद्य समाजसुधारक, स्त्री शिक्षणाचे उद्‌गाते आणि समाज परिवर्तनाचे शिल्पकार म्हणून आपण ज्यांचा अभिमानाने आणि गौरवाने उल्लेख करतो त्या महात्मा जोतिबा फुले आणि साध्वी सौ. सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर ठाण्याचे सन्मित्रकार श्री. स. पां. जोशी यांनी "मायबाप" ही सुंदर नाट्यकृती निर्माण केली आहे.

आजवर आपण महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्या-संबंधीची माहिती लेख आणि ग्रंथांच्याद्वारे घेतली. पण "मायबाप" च्या रुपाने या पतिपत्नींच्या थोर कार्याचे यथार्थ दर्शन त्यांच्यावरील या पहिल्यावहिल्या नाटकामुळे घडणार आहे. अशी ही एक सुंदर नाट्यकृती तयार केल्याबद्दल सन्मित्रकार श्री. जोशी धन्यवादास पात्र आहेत.

"मायबाप" च्या प्रकाशनाचे आणि नाट्यप्रयोगाचे अधिकार श्री. जोशी यांनी मुंबईच्या महात्मा फुले स्मारक समितीकडे सुपूर्द केल्याचे समजून अतिशय आनंद वाटला. आता या नाटकाचे प्रयोग महात्मा फुले स्मारक समितीच्यावतीने महाराष्ट्रात ठिकठिकाणी सहकारी बँका, नगरपरिषदा, साखर कारखाने व अन्य सामाजिक नि सांस्कृतिक संस्थांद्वारे संपन्न होतील. ओघवती भाषा, अचूक नाट्यप्रसंगांची निवड आणि फुले पतिपत्नींचे प्रभावी व्यक्तिचित्रण यामुळे "मायबाप" ही नाट्यकृती रसिकमान्य होईल अशी अपेक्षा आहे.

# महात्मा फुले स्मारक समितीचे कार्याध्यक्ष
# श्री. रा. सु. गवई यांचा अभिप्राय

महात्मा जोतिबा फुले यांच्या जीवनावर "मायबाप" हे पुस्तक नोव्हेंबर १९८४ मध्ये प्रकाशित होत आहे हे वाचून मला आनंद झाला.

महात्मा जोतिबा फुले यांचे ऋण मानावे तेवढे थोडेच पडतील एवढे त्यांनी महान कार्य केले आहे. समाजातील शोषितांच्या उद्धारासाठी महात्मा जोतिबा फुले आमरण झगडले. जातपात न मानता अन्यायाविरूद्ध निर्भयतेने लढून दलित, निरक्षर तसेच स्त्री वर्ग यांना न्याय मिळवून देण्यासाठी जोतिबा आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई यांनी आपले आयुष्य वेचले. अशा महान महात्म्याच्या जीवनावर नाटक लिहून व ते रंगभूमीवर सादर करुन लेखक श्री. स. पां. जोशी यांनी चांगले कार्य केले आहे. उक्त नाटकांत काम केलेल्या सर्व कलाकारांचे विशेषतः दिग्दर्शक श्री. सखाराम भावे व जोतिबाचे पात्र करणारे श्री. वसंत खरे यांना मी धन्यवाद देतो.

दि. १९-१०-१९८४.

# महात्मा फुले स्मारक समितीचे मानद सचिव
# श्री. मुकुंदराव पाटील यांचे निवेदन

'सन्मित्र' या ठाणे जिल्ह्याच्या जुन्या वर्तमानपत्राचे संपादकद्वय सर्वश्री शंकरराव लाठोरे व स. पां. जोशी यांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा मागोवा लेखकांच्या लेखांतून वाचकांना सादर करण्याचा पहिला प्रयत्न दि. १-१-१९७८ या दिवशी खास अंक प्रकाशित करून केला.

या समारंभाला मी उपस्थित होतो. म. फुले स्मारक समितीच्या कार्याला हा एक प्रतिसाद होता. याचवेळी एक विचार म्हणून महात्मा फुले यांच्या जीवनावर एक दर्जेदार नाटक लेखकानी लिहावे असे माझ्याकडून सांगितले गेले.

यानंतर लागोपाठ चार वर्षे सन्मित्र वृत्तपत्राचे चार विशेष अंक प्रसिद्ध झाले. त्यानिमित्त भव्य प्रमाणात समारंभही झाले. श्री. जोशी यांनी एक शालेय विद्यार्थ्यांना उपयुक्त अशी नाटिका दि. २७--१२-८१ च्या समारंभात सादर केली. लोकसत्तेचे त्यावेळचे संपादक श्री. विद्याधर गोखले यांनी श्री. जोशी यांच्या या उपक्रमाचा गौरव केला. त्यानंतर सतत बरेच वर्षाच्या परिश्रमाने श्री. जोशी यांना 'मायबाप' या नाटकाला पूर्ण आकार देण्यात यश मिळाले.

माझ्याकडून मी त्यांच्या उपक्रमांना सतत प्रोत्साहन देणे; त्यांच्या समारभांना उपस्थित राहणे ही मदत केली असल्यामुळे श्री. जोशी यांनी या नाटकाच्या पूर्ततेसाठी जे काही वाचन, मनन व लेखन केले त्याची जाणीवपूर्वक नोंद करीत आहे.

कादंबरी लेखक आदरणीय श्री. शिवाजी सावंत यांना जोतिरावांच्या जीवनावर नाटक लिहिण्यासंबंधी मी सूचना केली होती. पत्रव्यवहार झाला होता. आजारपणामुळे त्यांनी हे काम पूर्ण होवू शकत नाही असे लेखी कळविले.

'मायबाप--महात्मा फुले' हे उत्तम नाटक श्री. स. पां. जोशी यांनी लिहिले व गेल्या वर्षी स्वातंत्र्य दिनाचे दिवशी रंगभूमीवर आणले. कलाकरांचा संचही चांगला तयार केला. प्रेक्षकांपुढे नाटक आले. श्री. जोशी यांनी देहभान विसरून उत्कृष्ट नाटक रंगभूमीवर आणले आहे.

म. फुले स्मारक समितीने या नाटकाचे पहिल्या आवृत्तीचे प्रकाशन ३००० प्रती स्वखर्चाने छापून करण्याचा ठराव केला आहे. या पुस्तकाची प्रत ग्रंथालयांना विनामूल्य देण्याचे ठरले आहे.

या नाटकाचेद्वारे तळागाळातील माणसांपर्यंत फुले दांपत्याचे विचार पोहोचविला जाईल याबद्दल मला मुळीच शंका वाटत नाही.

लेखक व कलाकार यांना मनःपूर्वक धन्यवाद !

# मायबाप – महात्मा फुले

## लेखक - स. पां. जोशी

निर्मिती– अनुष्ठान व सन्मित्र कला केंद्र ठाणे.

दिग्दर्शक– सखाराम भावे

वेषभूषा– सुरेश ड्रेसवाला  रंगभूषा– वर्दम मेक अप सर्व्हिस

प्रकाश– सतीश ठाकूर  पार्श्वसंगीत– प्रकाश कोरगांवकर

पहिल्या सात प्रयोगांचे कलाकार

नारभट– अरुण वैद्य
धोंडीराम– गजेंद्र गोडकर
न्यायाधिश– विलास भणगे
पंडित– हरीश्चंद्र राणे
रोडे मांग– जगदीश राऊळ, बळीराम भुजबळराव
बामनभट– सुधाकर केळकर
शामभट– रमेश भिडे
हैबती– हणमंत नलगे
महार– सुधीर आठवले
मांग– विष्णू आरोटे
सार्जंट– राजीव घाणेकर
नागरीक– मोहन गोडकर
सावित्री– मंजिरी देव
काशी– माधुरी भागवत, विभावरी जोशी
जोतीराव– वसंत खरे

( शाहीर मंडळ– नामदेव कापडी, शांताराम धनावडे, भाऊराव पांढरे, उदय कुलकर्णी, पंडीत सोनवणे, गिरीश, विवेक व दत्तात्रय काळदाते )

# प्रस्तावना

श्री. स. पां. जोशी (ठाणे) यांनी 'मायबाप–महात्मा फुले' या नावाचे तीन अंकी नाटक लिहिले आहे. श्री. जोशी हे 'सन्मित्र' नावाच्या एका दैनिकाचे संपादक आहेत आणि त्यांना लिहिण्याचा नित्याचा अभ्यास आहे. तरी पण वृत्तपत्राच्या संपादकाला नाटक लिहिण्याची आवड असेलच असे नक्की म्हणता येत नाही. महात्मा फुले यांच्या-संबंधीच्या आदराने श्री. जोशी यांनी असे नाटक लिहिले आहे. कोणाही लोकोत्तर पुरुषा-संबंधी निबंध किंवा चरित्र असे काहीतरी लिहिण्यापेक्षा नाटक लिहिणे फार कठीण आहे याचा मला थोडा फार अनुभव आहे. असे नाटक लिहित असताना एका बाबतीत हे थोडेसे सोपे जाते कारण नाटकात आरंभीच्या प्रवेशामध्ये पात्रांची ओळख करून देणे हे एक महत्वाचे काम असते. ते निरनिराळ्या ललित प्रकारांनी पुरे करावे लागते, परंतु जेव्हा एखाद्या लोकोत्तर पुरुषासंबंधी नाटक लिहावयाचे असते तेव्हा पात्रांची ओळख करून देण्याचा प्रश्नच मुळी नसतो. बहुतेक सर्व पात्रे सर्व समाजाच्या आणि प्रेक्षकांच्याही ओळखीचीच असतात. नुसती पात्रांची ओळखच काय पण त्यांच्या स्वभावविशेषत्वाचीही त्यांना ओळख असते. त्यांच्या जीवनातील महत्वाच्या घटनाही सर्वश्रुत असतात. लेखकाला एवढेच काम शिल्लक राहाते की त्या घटना आकर्षक रीतीने लोकांपुढे ठेवावयाच्या. पण एक अडचण यामुळे निर्माण होते ती ही की येथे लेखकाच्या कल्पनाशक्तीला स्वैरसंचार करता येत नाही. एवढेच काय पण मर्यादित संचारही अवघड होऊन बसतो. कारण काल्पनिक गोष्टी अशा नाटकात घालणे फार अवघड असते आणि असा कल्पनाशक्तीचा विलास नसेल तर ललित वाङ्मय लिहिणे मोठे कठीण काम होऊन बसते. श्री. जोशी यांनी हे काम मोठ्या कौशल्याने पार पाडलेले आहे. मी उदाहरणे द्यावयास पाहिजेत असे नाही. परंतु जागोजागी याची प्रचिती वाचकांना आणि प्रेक्षकांना आल्याशिवाय राहाणार नाही. या नाटकाचा प्रयोग मी स्वत: आस्थापूर्वक पाहिला आहे. नाटकाची खरी परीक्षा रंगमंचावरच होत असते. अभ्यासिकेत बसून वाचण्याचे ते पुस्तक नव्हे. ते एक दृश्य काव्य आहे. नुसते काव्यच काय पण त्यात अनेक साहित्याचे प्रकार एकत्र गोवलेले असतात.

**नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य**
**बहुधाप्येकम् समाराधनम् ॥**

नाटक ही भिन्न रुचीच्या अनेक लोकांचे समाधान करणारी एक ललित कृती

आहे. मी सविस्तर प्रस्तावना लिहिण्याचे टाळीत आहे कारण कलेला रसिकांच्या गुणग्राहकतेची खरी प्रस्तावना लाभते. म्हणून अन्य औपचारिक अक्षरांच्या पलीकडे जाऊन मी रसिकांना असे आवाहन करतो की त्यांनी हे नाटक एक वेळ समक्ष पाहावे. महात्मा जोतिबा फुले यांच्या कर्तृत्वाने व ध्येयवादाने भरलेल्या जीवनाच्या पलीकडे रसिकांनी लेखकाच्या कलेकडेही थोडेसे लक्ष द्यावे कारण असे महान दिव्य जीवन लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठीच श्री. स. पां. जोशी यांनी अपार श्रम घेतलेले आहेत. या नाटकात काम करणाऱ्या कलावंतांनीही अगदी मन लावून आपले काम केलेले आहे. महात्मा फुले स्मारक समिती महाराष्ट्रातील समाजप्रेमी रसिकांना हा उपहार आदराने समर्पण करीत आहे. याचे स्वागत व्हावे हीच प्रार्थना.

–वि. स. पागे

मुंबई, दि. २–११–१९८४.

# "मला काही सांगायचय"

"मायबाप" हे जोतिबा आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरचं नाटक श्री. स. पां. जोशी यांनी, दिग्दर्शनासाठी माझ्याकडे सुपूर्द केलं त्यावेळी माझ्या डोळ्यासमोर अक्षरश: काजवे चमकले होते. स. पां. च्या दहा वर्षाच्या परिश्रमाचं ते फलित होतं आणि ते जास्तीत जास्त परिश्रम घेऊनच बसवायला हवं होतं. त्यासाठी लागणारे सगळे संदर्भ ग्रंथ स. पां. नी मला दिले होते. त्यांच्या वाचनातून कांही टाचणं काढून मी दिग्दर्शकाला लागणारी रंगावृत्ती तयार केली. आणि हौशी कलावंतांना जमा करून तालमींना सुरूवात केली.

मध्यंतरी सखाराम भावे म्हटलं, की तो हीट अँड हॉट नाटकांचा दिग्दर्शक असा माझ्या नावावर शिक्का बसला होता. पण व्यावसायिक रंगभूमीवर, मागणी तसा पुरवठा हे शास्त्र आपल्या मनाविरुद्ध का होईना पण पाळावंच लागतं. "मायबाप" या नाटकात सावित्रीबाई फुले आणि स्वत: जोतिराव फुले यांच्या कार्याला नाकं मुरडणाऱ्या त्या वेळच्या लोकांचा प्रतिनिधी म्हणून स. पां. नी, नारभट नावाचं एक काल्पनिक पात्र नाटकात घातलंय त्यामुळे मला नाटक बसवतांना जास्त त्रास झाला नाही. कारण जोतिबांची कॅरेक्टर फेज होती आणि नारभटाची कॅरेक्टर न्युट्रल होती. या दोन्ही कॅरेक्टर्स शेवटी एका नाजूक प्रसंगानी जवळ आल्यामुळेच नाटक प्रकाशमान झालंय.

या नाटकाच्या नेपथ्याची जबाबदारी ओघानंच माझ्याकडे आल्यामुळे दृश्यापेक्षा श्राव्याला मी जास्त प्राधान्य दिलंय. जोतिबा ज्या ठिकाणी वावरतील ते त्यांचं निवास-स्थान, तसेच न्यायाधिश ज्या ठिकाणी बसेल ती न्यायसभा आणि नारभट आणि त्याचे साथीदार ज्या ठिकाणी जमतात तो त्यांचा नेहमीचा अड्डा किंवा रस्ता, अशी स्थळांची विभागणी करून, दोन लेव्हल्स वापरून त्यावर मी नाटकाची मांडणी केलेली आहे. या नाटकात काही प्रसंगात केवळ कथानकाची साखळी जोडली जावी या उद्देशाने मला काही पात्रांच्या सावल्या दाखवून ते प्रसंग लाईफसाईज उभे करावे लागले आहेत. आणि ते प्रसंग अपेक्षित परिणाम साधूनही जातात.

' मायबाप — महात्मा फुले '. लेखक— स. पां. जोशी

"मायबाप" साठी एकंदर पंचवीस कलावंतांचा समूह असल्यामुळे आणि नाटकाची प्रकृती इतर व्यावसायिक नाटकांच्या प्रकृतीपेक्षा थोडी वेगळी असल्यामुळे या नाटकाचे प्रयोग विशिष्ठ प्रकारची पथ्ये पाळून करण्याचा आमचा मानस आहे. कारण जोतिरावांनी त्या वेळच्या समाजाला, शेवटचे क्षण मोजीत असतांना जी हेमगर्भाची मात्रा दिलेली आहे. तिचे चार वळसे आजही काही रुग्णांना देणे भाग आहे. ज्या ठिकाणी "तसल्या" रुग्णांची संख्या जास्त आहे अशाच ठिकाणी "मायबाप" या सवर्णमयी मात्रेचे प्रयोग करण्याचा आमचा मानस आहे

इतर देशातली मला कल्पना नाही, पण जोतिबा फुले हे भारतातले प्रथम महात्मा होते. पण आज ते लोकांच्या स्मरणात नाहीत असं वाटायला लागलंय. निर्मिकाच्या इच्छेपुढं कोणाचंच काही चालत नाही असं धरून चाललं तरी ज्या महात्म्यानं परीश्रम घेऊन आपल्यासाठी मळवाट तयार केली त्या वाटेवरून आपण जेव्हा अनवाणी चालत जात असतो तेव्हा एक क्षण का होईना आपण ही वाट कोणी तयार केली असावी याचा विचार करायला हवा.

असो, सध्याचं युग हे मागे वळुन पहाणारांचं नाही हेच खरं इतकंच मला सांगता येईल.

— सखाराम भावे
दिग्दर्शक

# लेखक श्री. स. पां. जोशी यांचे निवेदन

महात्मा जोतिराव फुले यांच्या जीवनावरील व त्यांच्या साहित्याच्या आधाराने वाचनात आलेल्या सर्व वाङ्मयातून एक नाट्यकलाकृती निर्माण करण्याचे मनाने घेतले. वस्तुतः ही सर्व प्रेरणा आमचे स्नेही संपादक श्री. शंकरराव लाठोरे यांच्या अनेक वर्षाच्या सहवासाने प्राप्त झाली होती. गेल्या आठ वर्षात महात्मा फुले स्मारक समितीचे सचिव माननीय श्री. मुकुंदराव पाटील व उपाध्यक्ष माननीय श्री. वि. स. पागे यांनी आमच्या 'सन्मित्र' च्या महात्मा फुले विशेषांकाचे प्रकाशन समारंभात भाग घेतला व तो स्नेह-संबंध वाढीला लागला. त्यांच्या भाषणातून आमच्या मनाला पटलेला एक मुद्दा जाणवत होता तो म्हणजे महात्मा फुले यांच्या जीवनावर एक दर्जेदार नाटक रंगभूमीवर यावे. त्यांची ही इच्छा त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितली होती.

महात्मा फुले यांच्या जीवनातील त्यांचे व सावित्रीबाईचे कार्य आणि त्यातून निर्माण झालेला संघर्ष या संदर्भात नजरेसमोर अनेक प्रकारची दृश्ये तरळत होती. सुमारे दोन वर्षाच्या काळात या नाटकाच्या लिखाणाची दोन तीन प्रकाराने मांडणी करून पाहिली. त्यातून प्रातिनिधीक चौकट निर्माण करण्याचा प्रयत्न रंगभूमीच्या माध्यमाला उपयुक्त वाटला.

रंगभूमीच्या माध्यमाला अनेक मर्यादा पडतात. 'मायबाप' चा पहिला प्रयोग १४ ऑगस्ट १९८३ ला साकार झाला. त्यावेळी प्रयोग पहाण्यासाठी आलेल्या शेवटच्या खुर्चीवरील प्रेक्षकांचे मत अजमावून पाहिले आणि त्यानंतर सात प्रयोग झाले. या पुस्तकाचे प्रकाशन होईपर्यंत आठ प्रयोगांचे, रसिकांचे आणि टीकाकारांचे जे मनोगत समजले त्यावरून चरित्र नाटक या प्रकाराला योग्य न्याय देण्यात यश मिळाले असे दिसते.

नाटकाचे प्रयोग काही वर्षे पद्धतशीरपणे होत जातात तेव्हाच त्या नाटकाचे एक प्रतिबिंब महाराष्ट्रातील नाट्यप्रेमी मंडळी आणि रसिक यांचे मनावर कायमचे उमटत असते असा अनुभव आहे. या अनुभवाला दुसरा कोणताच पर्याय नाही. भाषा ओघवती आणि कथानक बांधील असे असेल तर वाचक वर्ग नाटकाची पुस्तके परत परत वाचतात हे जरी खरे असले तरी किमान पंचवीस प्रयोग होतील तेव्हा त्या नाट्यकलाकृतीचा ठसा संस्मरणीय होईल असे अपेक्षित आहे.



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
आ. क्र. २०६५८ नों. दि. २९/१२/८२

महात्मा फुले स्मारक समितीच्या कार्यासाठी विविध योजना कार्यकर्त्यांच्या डोळ्या-समोर आहेत. त्यातील विधानसभेसमोरील भव्य पुतळा ही योजना अपूर्व अशीच साकार झाली आहे. 'मायबाप—महात्मा फुले' या नाटकाच्या पंचवीस प्रयोगांचे हक्क स्मारक समितीने घ्यावे तसेच पुस्तकाच्या एका आवृत्तीचे हक्कही घ्यावेत ही माझी सूचना स्मारक समितीच्या सर्वसाधारण सभेत स्वीकारली गेली. त्या ठरावानुसार ही पहिली आवृत्ती प्रकाशात येत आहे. स्मारक समितीचे अध्यक्ष, सचिव व सर्व सभासद यांचे मी कृतज्ञतेने सहर्ष आभार मानतो.

कै. धनजय कीर यांनी भारताच्या अद्वितीय पुरुषांची चरित्रे इंग्रजीतून लिहून जी अपूर्व अशी कामगिरी आयुष्यात केली ती माझ्या समोर आहे. त्यांच्या पुस्तकांच्या वाचनानेच 'मायबाप—महात्मा फुले' या नाटचकलाकृतीसाठी आम्ही सरसावलो यात तिळमात्र शंका नाही. ह्या नाटचकलाकृतीचा शिवाजी मंदिर येथे झालेला प्रयोग उपस्थित राहून त्यांनी पाहिला आणि एकमेव नाटचकलाकृती असा शेरा दिला. ही माझी अमोल ठेव आहे असे मी मानतो. कै. धनंजय कीर यांना या नाटचकलाकृतीद्वारे अभिवादन करीत आहे.

प्रयोगांसाठी 'सन्मित्र कलाकेन्द्र' ह्या संस्थेचा संकल्प जाहीर करून मी 'मायबाप—महात्मा फुले' या नाटचकलाकृतीच्या प्रयोगांसाठी शक्य तेवढा प्रयत्न करण्याचे योजिले आहे. अनुभवाचे अनेक धक्के व आर्थिक नुकसान सोसावे लागले तरी आठ प्रयोग या-पूर्वीच हालअपेष्टा सहन करून पूर्ण केले आहेत.

"केल्याने होत आहे रे" या ध्येयाला चिकटून मी विचारवंत व धनिक आश्रय-दात्यांची विविध प्रकारे मदतीची अपेक्षा पुढील प्रयोगांसाठी करीत आहे. उत्स्फूर्त असा पाठिंबा आज ना उद्या या कार्यासाठी नक्कीच मिळणार अशी माझी मनोदेवता सांगते. स्मारक समितीच्या संकल्पात जेवढे काही करता येण्यासारखे असेल तेवढे या नाटचकला-कृतीसाठी होईलच परंतु महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्यालयानेही पुढे यावे ही आमची रास्त अपेक्षा व्यक्त करून हे निवेदन पूर्ण करतो.

दिग्दर्शक व कलाकार यांचा मी आमरण ऋणी आहे.

आतापर्यंत रसिकांची पोचपावती मोठ्या प्रमाणात अभिप्राय येऊन मिळाली आहे. ती उत्तरोत्तर वृद्धिंगत होवो.

# कै. जोतिराव गोविंदराव फुले यांच्या चरित्राचा कालपट (१८२८ ते १८९०)

| घटना | वर्ष |
|---|---|
| जन्म | २०–२–१८२८ |
| पंतोजींच्या शाळेत मराठी शिक्षण | १८३४–३८ |
| कावडी येथील झगडेपाटील यांच्या कन्येशी विवाह | १८४० |
| मिशनरी शाळेतील माध्यमिक (इंग्रजी) शिक्षण | १८४१–४७ |
| लहुजीबुवाकडे तालीम आणि क्रांतीकारक विचार | १८४७ |
| टॉमस पेनकृत 'राईटस् ऑफ मॅन' या ग्रंथाचे मनन | १८४७ |
| उच्चवर्णीय लग्नाच्या मिरवणूकीत झालेला अपमान | १८४८ |
| शूद्रातिशूद्रांसाठी मुलींची शाळा | १८४८ |
| शूद्रादिकांना शिक्षणदान करण्याचे व्रत घेतल्याने सौभाग्यवतीसह करावा लागलेला गृहत्याग | १८४९ |
| मराठी प्रकाशनांना अनुदान देण्याची मागणी करणाऱ्या सुधारकांच्या सभेला दिलेले संरक्षण | १८४९ |
| चिपळूणकरांच्या वाड्यातील व रास्तापेठेतील मुलींच्या शाळांची स्थापना, मे. कॅंडी यांचे अध्यक्षतेखाली शिक्षणकार्याबद्दल सरकारी विद्याखात्याकडून सत्कार | १८५२ |
| स्कॉटिश मिशनऱ्यांच्या शाळेत अर्धवेळ शिक्षकाची नोकरी | १८५४ |
| 'तृतीय रत्न' नाटकाचे लेखन | १८५५ |
| रात्रीच्या शाळेची स्थापना | १८५५ |
| मारेकऱ्यांकडून हत्येचा प्रयत्न | १८५६ |
| शाळांच्या व्यवस्थापक मंडळातून निवृत्ती | १८५८ |
| विधवा–पुनर्विवाहास साहाय्य | १८६० |
| बालहत्या–प्रतिबंधक गृहाची स्थापना | १८६३ |


| घटना | वर्ष |
|---|---|
| तुकाराम तात्या पडवळकृत 'जातिभेद विवेकसार' या ग्रंथाच्या द्वितीयावृत्तीचे प्रकाशन | १८६५ |
| वडील गोविंदराव यांचा मृत्यु | १८६८ |
| घरचा हौद अस्पृश्यांसाठी खुला | १८६८ |
| 'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा' | १८६९ |
| 'ब्राह्मणांचे कसब' | १८६९ |
| 'गुलामगिरी' | १८७३ |
| सत्यशोधक समाजाची स्थापना | १८७३ |
| दयानंद सरस्वतींची मिरवणूक | १८७५ |
| पुणे नगरपालिकेचे सदस्यत्व | १८७६–८२ |
| दारूची दुकाने उघडण्यास नवे परवाने देऊ नयेत म्हणून प्रयत्न | १८८० |
| हंटर–शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन | १८८२ |
| बंदिशाळेतून सुटलेल्या टिळक–आगरकरांचा सत्कार | १८८२ |
| 'शेतकऱ्याचा आसूड' | १८८३ |
| 'सत्सार क्र. १' | १८८५ |
| 'सत्सार क्र. २' 'इशारा' | १८८५ |
| सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकासह सर्व पूजा विधि | १८८७ |
| ड्युक ऑफ कनॉटचा सत्कार आणि फुलेकृत दंभस्फोट | १८८८ |
| जनतेकडून सत्कार आणि 'महात्मा' ही पदवी अर्पण | १८८८ |
| 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' या मरणोत्तर (सन १८९१) प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाचे लेखन | १८८९ |
| मृत्यु | २८ नोव्हेंबर १८९० |

नाटकाच्या दृश्याचा कालखंड १८५६ ते १८८८ इतकाच आहे. सोईसाठी काल आणि घटना यांचा नाट्य रचनेच्या ऐतिहासिक क्रमात थोडा बदल करावा लागला आहे व नाटकातील अठरा पात्रांपैकी पांच प्रातिनिधीक स्वरूपाची परंतु कल्पीत नावांची आहेत.

सावित्रीबाई जन्म ३ जानेवारी १८३१, मृत्यु १० मार्च १८९७

नाटकाची सुरुवात होते तेव्हा जोतिराव वय वर्षे २८

सावित्रीबाई वय वर्षे २५.



महात्मा फुले स्मारक समितीचे मानद सचिव श्री. मुकुंदराव पाटील यांचे हस्ते पहिल्या स्मरणिकेचे उद्घाटन –



माननीय श्री. रा. सु. गवई, मा श्री वि स पागे, मा. श्री. मुकुंदराव पाटील व लेखक श्री. स. पां जोशी आणि जोतिरावांचे भूमिकेंत श्री. वसंत खरे



न्यायाधिशांकडे तक्रारींची वर्णी लावण्यासाठी खलनायकाची सेवकाकडे तरफदारी (अंक १ प्र. १)



जोतीराव फुले यांना मारण्यास आलेल्या मारेकऱ्यांचे हृदयपरिवर्तन (अंक १ प्र. ३)



जोतीराव फुले पुणे नगरपालिकेचे सभासद निवडून आले. (अंक २ प्र. ३)



टिळक-आगरकर यांची डोंगरीच्या जेलमधून सुटका झाल्यावर जोतीराव फुले यांनी भव्य मिरवणूक काढली. (अंक ३ प्र. १)





☝ सावित्रीबाई फुले यांच्या वरील चांडाळचौकडीचा हल्ला थोपवितांना –जोतीराव (अंक १ प्र. ४)

(✱✱✱)

☜ नारभट सावकार व न्यायाधिश (अंक १ प्र. २)

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. २०६४६ नों. दि ........ 29/9/2
वि. ....अ२.... क्र. ............

# मायबाप – महात्मा फुले

लेखक– स. पां. जोशी

## अंक पहिला -- प्रवेश पहिला

( शहरातील एका चौकात शाहिर पोवाडा गात आहे. आजुबाजूला बरीच गर्दी आहे. त्या गर्दीत, न्यायाधिशांचा सेवक हैबतीही आहे. )

या क्षेत्राचे धनी कोण कोणी बुडविले । सांगतो तुम्हा कसें झाले ।।
क्षेत्रवासी म्हणोन नांव क्षत्रीय धरले । क्षेत्री सुखे राहिले ।।
अन्य देशीचे दंगेखोर हिमालयी आले । होते लपून राहिले ।।
पाठी शत्रू भवती झाडी किती उपाशी मेले । गोमासा भाजुनी धाले ।।
पाला फळें खात आखेर ताडपत्रा नेसले । झाडी उल्लंघून आले ।।
लेखणीच्या धड शिपाया सैनापति केले । मुख्य ब्रह्मचा नेमले ।।
बेफाम क्षत्रीय होते अचूक टोळ उतरले। कैदी सर्वांस केले ।।
सर्व देशी चाल त्याचे गुलाम बनीवले । डौलाने क्षुद्र म्हणाले ।।
मुख्य ब्रह्म राजा झाला ज्याने कायदे केले । त्याचे पुढे भेद केले ।।
भेद म्हंजी वेद वेद
ब्रह्म मेल्यावर परशराम पुंड माजले । उरल्या क्षत्रीया पिडीले ।।
महारमांग झाले किती देशोधडी केले । ब्राह्मण चिरंजीव झाले ।।
स्वत:ला भूदेव म्हणवून घ्यायला लागले
देश निक्षत्रीय झाल्यामुळे यवना फावले । सर्वांस त्याही पिडीले ।।
क्षुद्र म्हणती तुम्हा हृदयी बाण टोचले । आज बोधाया फावले ।।
ज्योतिबांचा हा मंत्र विसरू नका, स्वत:ला ओळखा
आपण या देशाचे वारस खरे, पण हे आर्यभट इराणी आले इथे उपरे

निर्मिक एकला मानुनी जगाचा
धर्म एक त्याचा दलित सेवेचा
सत्यशोध घेई खरा धर्म त्याचा
तया शाप नोहे भटा भिक्षुकांचा ॥

(पोवाडा संपल्यावर शाहीर श्लोक म्हणतो. इतक्यात नारभट सावकार तावातावाने प्रवेश करतो.)

नारभट : ए डफड्या, बंद कर, बंद कर तुझी बाष्कळ बडबड. माझा, या नारभट सावकाराचा शाप आहे. चला चालते व्हा. (सर्वजण हळू हळू जातात) पाखंडी, धर्मबुडवा. दलितसेवेचा धर्म म्हणे ! सत्याचा शोध घेतायत हातात डफऱ्या घेऊन.

हैबती : सावकार, समदे गेले, आता काय सवताशीच बोलता व्हय ? पाखंडी आनि धरमबुडवा कोनबी नाय हीतं.

नारभट : सगळेच पाखंडी आहेत, आता इथं घसाफोड करून गेलेला डफड्या-सुद्धा त्याचाच चेला आहे. हं ! निर्मिक एक आहे म्हणे.

हैबती : अवं निरमिक म्हनलं म्हनुन धरम डुबतोय व्हय ?

नारभट : मूर्ख आहेत, तूही त्याचाच चेला आहेस. अरे देव म्हणायला तोंडं शिवली कारे तुमची कोणी ?

हैबती : बरं तुमच्यासाटी, द्येव येक हाय असं म्हनू आपन.

नारभट : हेच, हेच, तो सुद्धा हेच सांगत फिरतोय.

हैबती : मग त्येचं काय चुकलं ? द्येव काय अलग अलग असत्यात व्हय ?

नारभट : शतमूर्ख आहेस, आपल्या धर्मात थोडे थोडके नाहीत चांगले तेहतीस कोटी देव आहेत. जरा त्यांची नावं आठव, म्हसोबा.

हैबती : तोंड सांभाळून बोला सावकार नायतर

नारभट : अरे, म्हसोबा हे सुद्धा देवाचंच नाव आहे.

हैबती : त्ये हाय ठावं, पन मला तुमी मानसाच्याच नावानं हाक मारा. हैबती म्हना हैबती, समाजलं ? आपल्या वाटंला नाय जायचं हां.

नारभट : हे बघ मी न्यायाधिशांची भेट घ्यायला आलोय ...

हैबती : पन वाटत मी हुबा हाय ना ? पयलं नंदीचं दर्सन घ्या, मग म्हादेवाचं, समाजलं ? वाचा, वाचा ( बिल्ला दाखवतो) बोला काय तक्रार हाये तुमची ?

नारभट : तक्रार ? तक्रारी म्हण तक्रारी, पण आज ही शेवटची तक्रार आहे. लेखी. (कागद दाखवतो) आज प्रत्यक्ष भेटून सोक्षमोक्ष लावायचाय मला. चल, त्याची सगळी प्रकरणं न्यायाधिशांच्या कानावर घालतो. तेही ब्राह्मण आहेत. मीही ब्राह्मण आहे.

हैबती : ज्याची तक्रार करायची हाये तो बी बामनच हाय का ?

नारभट : तो ? तो पाखंडी आहे, धर्मबुडवा आहे.

हैबती : म्हंजी त्योबी नक्कीच बामन असला पायजे. काय नाव त्येचं ?

नारभट : मी त्याचं नावही घेत नाही.

हैबती : मग तक्रार कशी नोंदवनार ?

नारभट : ती मी लिहून आणल्ये, ही बघ. (दाखवतो) या एकाच कागदानं (हंसतो) त्याला देहांत प्राय:श्चित्त द्यायला लावलं नाही तर नावाचा नारभट सावकार नाही.

हैबती : तुमी कंचेबी भट असा, पण हितं मी भट हाय. तवा दक्षना घ्यायचा आदीकार माजा हाये, समाजलं ? चला आटपा झटशिनी, माज्या तळ हाताला लयी कंड यायला लागल्याली हाये.

नारभट : हे घे. (रुपयाचे नाणे देतो) चल तूही आता आटप लवकर.

हैबती : ही झाली न्यायाधिश दाखवन्याची दक्षना, त्यांची भ्येट घ्यायाची आसल तर (हात खाजवतो).

नारभट : आलं लक्षात, हे घे. (दोन रुपये देतो)

हैबती : द्या तो कागुद हिकडं.

नारभट : तुझ्याजवळ नाही देणार. मी तो स्वत:च त्यांच्या हातात देणार आहे.

हैबती : सावकार, हितं आलं कां हितलीच रीत पाळाया लागती. समाजलं ? तक्रारीचं सरूप काय हाय या वरून तक्रार करनाराची लायकी ठरीवतो आमी. आनि मानुस लायक असला तरच आत घेतो आमी त्याला.

नारभट : म्हणजे मी त्या लायकीचा नाही असं म्हणायचंय की काय तुला ? मी एक प्रतिष्ठीत सावकार आणि सुशिक्षित नागरिक आहे इथला. चल बाजूला हो, अन्यथा मला ती घंटा वाजवावी लागेल.

हैबती : ती लीवता वाचता न येनाऱ्यांसाटी हाय.

नारभट : पण मला ती नाईलाजानं वाजवावी लागेल.

हैबती : त्यामुळं तुमी अनाडी हायेत असं शिद्द व्हयील त्याला आमचा बी ना विलाज व्हयील. आनि मग सव घोडे बारा टक्के न्याय भेटल तुमास्नी. मग माज्या मध्येस्तीचा कायबी उपेग व्हनार न्हाय. चालल तुमास्नी ?

नारभट : असं कसं ? माझ्याकडून तुला लाभ झालाय तेव्हा तुला माझं काम केलंच पाहिजे.

हैबती : मग द्या तो कागुद हिकडं.

नारभट : हे बघ, मी तुझा हात आणखी ओला करतो पण काहीही करून माझी आणि न्यायाधिश साहेबांची प्रत्यक्ष भेट घालून दे. हं. हे घे. (पैसे देतो)

हैबती : असं तडकाफडकी नाय भ्येटता यायचं त्येस्नी, तुमच्या अदुगर जे कोन आल्यालं हायेती त्येंचाबी इचार क्येला पायजे का नाय आमास्नी ? आनि त्यातून आता पंडितजी येनार हायत. चर्चे साठनं.

नारभट : कोण ? पंडीत येणार आहेत ? अरे गाढवा...?

हैबती : हैबती म्हना हैबती.

नारभट : अरे मग पंडीत येणार आहेत हे आधी का नाही सांगितलंस ? चला, बरं झालं त्यांच्याच बरोबर मी आत जाईन.

हैबती : न्हाई न्हाई न्हाई. तसं नाई व्हनार. पंडीत आत जातिल तवा तुमी हितच हुब ऱ्हायचं त्येंच्या स्वागताला.

नारभट : माझ्यासारख्या प्रतिष्ठित सावकाराच्या...

हैबती : अवं तुमच्या सारख्या परतिष्ठीत सावकारानीच शास्त्री, पंडीताची पुजा करायची आसती.

नारभट : लांब जीभ करून बोलू नकोस, आम्ही ब्राह्मण सावकार म्हणजे या देशाचे भूषण आहोत. (पंडीत प्रवेश करतात.)

पंडीत : अगदी बरोबर, ज्याच्या ठायी लक्ष्मी आणि सरस्वती एकाच वेळी वास करतात अशी व्यक्ति खरोखरच भूषणास्पद असते.

नारभट : पण इथल्या मूर्खांच्या हे लक्षात येईल तेव्हा ना ? आमच्यासारख्या सज्जनांना, साध्या तक्रारीसाठी रक्त आटवावं लागतं. अहो नुसतं न्यायाधिशांपर्यंत पोचायला वाटेत हे...हे असले किती अडसर ओलां-

डावे लागतात आम्हाला. काय उपयोग आहे आमच्या शिक्षणाचा आणि श्रीमंतीचा ? दरिद्री नारायणांना या घंटानादानं न्यायदान केलं जातं आणि आम्ही कितीही शंख-ध्वनी केला तरी आमच्याकडे ढुंकूनही कोणी पहात नाही. म्हणे हे निःस्पृह न्यायाधिश ?

पंडीत : सावकार, आपली तक्रार तरी कोणाविरूद्ध आहे ?

हैबती : त्याचं नाव ते घेत नाहीत.

पंडीत : आलं लक्षात. सावकार, फलप्राप्ती जशी श्रद्धेशिवाय होत नाही तशीच फुलाशिवाय फळाचीही उत्पत्ती होत नाही. म्हणूनच फलप्राप्ति झालेले वृक्ष आपोआप नम्र होत असतात.

नारभट : मला तुमचं तत्वज्ञान नको आहे. मला न्यायाधिशांची भेट हवी आहे. त्यासाठी तुम्ही काय करता ते बोला.

पंडीत : त्यासाठी माझ्या मध्यस्थिची काय गरज आहे ?
(पंडीत, हैबती जातात,)

नारभट : मग चला, तुम्ही तुमच्या उद्योगाला लागा. मध्यस्थी म्हणे ! हं ! कसा न्याय मिळत नाही तेच बघतो. सरळ सरळ नाही मिळाला तर विकत घेईन मी तो न्याय आणि तो न्यायाधिश सुद्धा. त्या धर्म-बुडव्याला देहांत प्रायश्चित्त देऊन या जगातून घालवल्याशिवाय मला सुखानं झोप लागायची नाही.

( प्रवेश पहिला समाप्त )

# अंक पहिला – प्रवेश दुसरा

( न्यायसभा. पांच सहा प्रतिष्ठित नागरिक व पंडीत बसलेले आहेत.)

न्यायाधिश : आपणा सर्वांची बाजू मी ऐकून घेतली तशीच मला दुसरी बाजूही ऐकून घेतली पाहिजे. न्यायदेवतेने डोळ्यावर पट्टी बांधली असली तरी तिच्या मनःचक्षूतून कोणतीही गोष्ट सुटू शकत नाही. त्यामुळेच तिच्या हातातल्या तराजूचा समतोल साधला जात असतो.

१) नागरीक : सुधारणा आम्हाला नकों आहेत असं नाही. पण संकेत आणि रुढी पायदळी तुडवून जर त्या होणार असतील तर मात्र आमचा अगदी कडक विरोध आहे.

२) नागरीक : आता हेच बघ ना, या जुन्नर कोर्टानं दिलेल्या निर्णयानं सगळीकडे हाच पायंडा पडला तर उद्या समस्त भिक्षुकवर्गाला उपाशी मरावं लागेल.

१) नागरीक : शिक्षणाची तीच गत, महारा-मांगांना सुशिक्षित करून, त्याचे परिणाम चांगले का होणार आहेत ? उद्या ही जमात आमच्या मांडीला मांडी लावून बसली तर काय होईल याची कल्पना करा.

न्यायाधिश : हे बघा, तुम्हा दोघांना मी एकाच वेळी बोलावलं होतं, पण आपण वेळे आधीच इथं हजर झालात. मी ब्राह्मण असलो तरी न्यायाधिशाच्या जागेवर आहे हे लक्षात ठेवा. मला त्यांचीही बाजू ऐकली पाहिजे. त्या नंतर साधक-बाधक चर्चा करूनच जो कांही निवाडा द्यायचा तो देऊ आम्ही. (घंटा वाजते. न्यायाधिश सेवकाला खूण करतात. तो जातो.) आपण सुशिक्षित आहात. विचारवंत आहात, तेव्हा त्यांचं जे काही म्हणणं असेल ते आपण शांतपणानं ऐकून

घ्यावं अशी माझी तुम्हा सर्वांना विनंती आहे. ( बाहेरून दोन तीन महार–मांग येतात. त्यांच्या मागोमाग नारभट प्रवेश करतो. ) या. या. बसा

महार : जोहार धेवा. जोहार. (न्यायाधिशाच्या आणि इतरांच्या पाया पडतात)

न्यायाधिश : मी फक्त तुम्हा लोकानाच बोलावलं होतं. सावकाराना इथ येण्याची तसदी कशाला घ्यायला लावलीत ?

मांग : त्येस्नी आमी न्हाई आनलं धेवा, त्ये सवताच आमच्या मागं आल्यात.

नारभट : मी इथं का आलो याचं उत्तर या समर्थांच्या घरच्या श्वानाला. म्हणजेच या आपल्या सेवकाला विचारा.

न्यायाधिश : उपमा अलंकारात बोलू नका सावकार, तो इथं चाकरी करतो, नियमाच्या बाहेर वागणं त्याला कसं जमेल ?

नारभट : पण माणूसकी नावाचा काही प्रकार असतो हे तरी त्याला ठाऊक आहे का ? अहो, परोपरीनं मी त्याला सांगितलं तरी हा मला आत सोडीना. तेव्हा नाईलाजानं मला या महारा--मांगांच्या मागोमाग यावं लागलं.

न्यायाधिश : ठीक आहे, आपली कांही तक्रार आहे का ?

नारभट : गेले कित्येक दिवस मी नुसत्या तक्रारीच करतोय.

न्यायाधिश : कशाबद्दल आणि कोणाबद्दल ?

पंडीत : त्यांच्या नावाचा उच्चार करीत नाहीत ते.

न्यायाधिश : तो त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. (कारकुनाला) यांच्या तक्रारीची नोंद करून घ्या आणि यांना जाऊ द्या.

नारभट : जाऊ द्या ? न्याय न देता ही असली हकालपट्टीची भाषा ?

न्यायाधिश : कारण न्याय असा तडकाफडकी मिळत नसतो. तो मिळतो योग्य साक्षी–पुरावे झाल्यावर. ज्याच नाव तुम्ही टाळताहात त्याच्या नावाचा जप करणारेही असंख्य लोक आहेत या महाराष्ट्रात. त्यांचीही बाजू ऐकून घेणे भाग आहे.

नारभट : म्हणजे तुम्हाला सरळ सरळ त्या धर्मबुडव्याच्या बाजूनेच न्याय द्यायचा आहे असं सांगा ना !

पंडीत : तो धर्मबुडवा आहे असं गृहीत धरू, पण त्याच्यावर हा आरोप करताना धर्मतारणासाठी आपण स्वतः काय काय केलंत ते कळलं असतं तर बरं झालं असतं.

नारभट : या हातानं आतापर्यंत हजारो सत्यनारायण, सत्यविनायक, लघुरुद्र, महारुद्र, शतचंडी, सर्वारिष्ठ यज्ञ, सांगायला गेलं तर बरंच कांही केलंय.

पंडीत : हे सगळं दक्षिणेशिवाय नाही ना केलंत? अहो! सावकार ही उपाधी अलीकडेच लागल्ये आपल्या मागे, पूर्वी आपण साधे भिक्षूकच होतात.

नारभट : माझा पूर्वेतिहास काय होता याचा इथं काहीही संबंध नाही.

न्यायाधिश : म्हणूनच म्हणतो आपली तक्रार नोंदवून घेतलेली आहे तेव्हा ....

नारभट : इथून तोंड काळं करा, आणि आम्हाला सुखेनैव खऱ्याचं खोटं आणि खोट्याच खरं करण्याची खलबतं करीत बसू द्या. पण लक्षात ठेवा, आम्ही सावकारलोक नुसता न्यायच नाही तर न्यायाधिश सुद्धा विकत घेऊ शकतो.

न्यायाधिश : नारभट, जी गोष्ट कुबेराला सुद्धा जमणार नाही तिथं तुमच्या सारख्या व्याजबट्टयावर आणि गहाणवटीवर जगणाऱ्या पोटभरू सावकाराला कशी काय जमेल?

नारभट : गहाणवटीचा व्यवहार केला तरी आम्ही आमची अक्कल कांही गहाण टाकलेली नाही. व्याजबट्टा केला म्हणून आमच्या बुद्धीला काही बट्टा लागलेला नाही. न्यायाचा काटा आमच्या बाजूला झुकवण्याची करामत कशी करायची हे आम्ही चांगलं जाणतो. सर्वे गुणा कांचनमाश्रयंते. काय मंडळी?

(कोणीही प्रतिसाद देत नाहीत) अरे, उचकटा की तोंड. समस्त ब्राह्मण जातीवर आकाश कोसळण्याची वेळ आलेली असतांना तुम्ही इथं चर्चा कसल्या करताहात?

पंडीत : सावकार, ज्या समस्या बुद्धीच्या जोरावर सोडवायच्या असतात तिथं द्रव्यबळाचा उपयोग होत नसतो.

नारभट : पंडीत, ज्या दिवशी हा तुमचा काथ्याकुट संपेल, तेव्हा ही महारं-मांगं तुमच्या डोक्यावर बसलेली असतील. त्यावेळी एकच गोष्ट होईल ती म्हणजे "पश्चात् बुद्धी बामणीया". भटाभिक्षुकांवर सध्या उपासमारीची वेळ आलेली आहेच. तीच गत तुम्हा शास्त्री पंडीतांची

होणार आहे. तेव्हा जरा विचार करा आणि माझ्या मार्गानं माझ्या मागे या.

पंडीत : घुबडा-मांजरांना अंधारात स्वच्छ दिसतं म्हणे पण माणसाला मात्र दिव्याचीच गरज लागते.

नारभट : लावा लावा, दिवे लावा. एकूण तुम्ही लोकसुद्धा त्यालाच सामील आहात तर ! पण लक्षात ठेवा दिव्याची ज्योत झंझावाताशी टक्कर देऊ शकत नाही.

मांग : पन येखांद्या वक्ताला त्याच जोतिनं वनवा लागायाबी येळ लागत न्हायी सावकार.

नारभट : ऐका, याला म्हणतात माकडाच्या हातात कोलीत. कसे पोपटासारखे बोलायला लागलेत एक एक. श्रीची अजून नीट फोडता येत नाही गधड्यांना पण भाषा ऐका ! तो पाखंडी यांना चिथावतो आणि ही कुत्री पिसाळतात.

न्यायाधिश : सावकार, ही न्यायसभा आहे. शिष्ठसंमत भाषेत बोला. आपल्या तक्रारीची नोंद झालेली आहे. आपण जाऊ शकता.

नारभट : आम्हाला घालवून द्या आणि यांच्या गळ्यात गळे घाला.

न्यायाधिश : प्रथम आपण तोंडाला लगाम घाला आणि अपमान करून घ्यायचा नसेल तर आल्या पावली इथून निघून जा.

नारभट : मी जातोच पण माझ्या बरोबर किती जणांना घेऊन जातो हे तुम्ही बघाच, काट्यानं काटा नाही काढला तर नावाचा नारभट नाही. (ताडताड निघून जातो.)

न्यायाधिश : पाहिलंत ? सगळीकडं हा असा असंतोष निर्माण झालाय. आज ना उद्या समस्त दलीत वर्ग उच्चवर्णीयांच्या हक्कावर अतिक्रमण करील या भितीनं सगळं वातावरण प्रक्षुब्ध होत चाललंय. आणि याला जबाबदार आहेत जोतिबा फुले.

मांग : धेवा, त्येस्नी कशासाठनं जबाबदार धरता ? त्यो आनि त्येंची कारभारीन आमचं मायबाप हैती. आमी त्येंची लेकरं. लेकराला सुकाचे दिस दिसाया नाय पायजे; असं कंच्यातरी मायबापास्नी वाटल का ?

न्यायाधिश : आम्ही त्यांना किती वेळा इथं पाचारण केलं पण आपली बाजू त्यांनी इथं येऊन कधी मांडलीच नाही. ते नेहमी आपल्याच कामात गर्क असतात. समाजाचा रोष पत्करून समाजकार्य करणं म्हणजे सुळावरची पोळी असते, पण हे त्यांना सांगणार कोण ?

मांग : अव जलमदात्याचाबी रोस पत्कारल्येला मानसाला इतरांच्या रागा-लोभाची काय किंमत असनार, आमचं माय-बाप सदानकदा आमच्या साठनंच झगडत असत्यात. या वक्तालाबी त्येंचं कायबाय चालूच आसल. आमची मायबी लयी धीराची बाय, खांद्याला खांदा लावूनशी झटती बगा जोतिबाच्या.

( दृष्य बदलते--जोतिबांची झोपडी )

# अंक पहिला -- प्रवेश तिसरा

(जोतिबा झोपडीत वाचत बसलेले आहेत. थोड्या वेळाने सावित्रीबाई येतात व एक मोठी चोपडी आणि बोरू घेऊन बसतात.)

सावित्री : आता पुरे झालं वाचन.

जोतिबा : पुस्तक संपायला आणि तू यायला एक गाठ पडली बघ.

सावित्री : ( चोपडी सरसावत ) हं, सांगा आज काय काय झालं ! कोण कोण भेटलं ?

जोतिबा : सावित्री, कशाला करतेस हा नोंदवही लिहिण्याचा व्याप ? दिवसभर मी तुला गाड्याला जुंपलेलं आहेच, रात्री तरी लवकर विश्रांती घेत जा.

सावित्री : आपण मागं ते इंग्रजी पुस्तक वाचलं होतत, ज्या पुस्तकानं आपल्याला बेचैन केलं होतं आणि अजूनही करतंय, त्या पुस्तकाचं नांव काय होतं ?

जोतिबा : "राईटस् ऑफ मॅन" म्हणजे माणसाचे हक्क.

सावित्री : हो ना ? म्हणूनच या नोंदवहीला मी नांव दिलंय...

जोतिबा : काय नांव दिलंयस ?

सावित्री : "हक्काचं माणूस". मग या हक्काच्या माणसानं दिवसभरात काय केलं ते मला समजून घ्यायचा हक्क आहे की नाही ?

जोतिबा : पण या असल्या नोंदी कुणाला दाखवायच्येत का ?

सावित्री : दुसऱ्यांना दाखवण्यासाठी नाही पण :स्वत:ला मागं वळून बघता यावं, यासाठी लिहिल्ये मी ते. आपण मला शिकवलंच नसतं तर कशाला केला असता मी हा हट्ट.

जोतिबा : बरोबर आहे. झगडे पाटलांच्या घराण्यातली तू. आपला हट्ट झगडूनच मिळवणार.

सावित्री : झगडल्याशिवाय काहीच मिळत नाही या जगात. आपल्या लग्नाला अकरा वर्षे झाली, तेवढ्या काळात कितीतरी वादळं आली आणि शांत झाली. (मागची पाने उलटतात) ज्या दिवशी लग्नाच्या मिरवणूकीत आपला अपमान झाला त्या दिवशी मला झोप लागली नाही.

जोतिबा : झाल्या गोष्टी विसरून जाव्या माणसानं.

सावित्री : त्या विसरण्यासाठीच मी हा छंद लावून घेतलाय. ज्या दिवशी कँडी साहेबांच्या अध्यक्षतेखाली आपला सत्कार केला शिक्षण खात्यानं...

जोतिबा : खरं म्हणजे तो तुझाच सत्कार होता. सावित्री, माझ्याबरोबर उमेदीनं वाटचाल केलीस तू त्या मुळेच ...

सावित्री : उगाच काहीतरी बोलायचं, लग्न होऊन मी वाड्यावर आले तेव्हा आपला पुस्तकांचा ढिगारा बघून, छाती दडपली होती माझी.

जोतिबा : हं, पण आता काहीच वाटत नाही ना त्यांचं ? विद्येची किमयाच आहे तशी, हक्काचा विद्यार्थी घरात आला होता, म्हणून अगदी हात धुवून तुला लिहा--वाचायला शिकवण्याचा चंगच बांधला होता मी.

सावित्री : त्या विद्यार्थ्याचा शिक्षक केव्हा आणि कसा झाला हे कळलंसुद्धा नाही मला. "इकडचा बोल मनात परसा। जीवनाचा आरसा पाहते मी"

जोतिबा . सावित्री, तुझ्यावर फार मोठी जबादारी टाकल्ये मी.

सावित्री : आपण काही काळजी करू नका. आपल्या विद्येच्या ज्योतिला मी वाऱ्याची झुळूकसुद्धा लागू द्यायची नाही. तिला अखंड तेवत ठेवीन.

जोतिबा : आज ना उद्या त्या ज्योतिची मशाल बनेल आणि सगळा अंधार नाहीसा होईल याची खात्री आहे मला. (कागद काढतात) हे पाहिलंस सावित्री, काय आहे ते ?

सावित्री : काय आहे बाई. (बघते) इथं आमचं ज्ञान तोकडं आहे.

जोतिबा : अग हे स्कॉटीश मिशनरी शाळेकडून आलंय, मला अर्धवेळ शिक्षक म्हणून बोलावलंय त्यांनी.

सावित्री : मग हे आधी का नाही सांगितलंत ? (नोंद करते)

जोतिबा : अग हे नुसतं बोलावणं आहे.

सावित्री : पण त्यालासुद्धा महत्व आहे. असेच महत्वाचे क्षण साठवून ठेवलेत मी या नोंदवहीत. दिवसभर मुलींना शिकवण्यात स्वत.ला विसरते पण घरी आल्यावर... एक एक पान पुनः पुन्हा वाचते आणि नवे नवे क्षण जमा करते.

जोतिबा : सावित्री, तुझ्या मनाची घालमेल कळतेय मला. पण......

सावित्री : (विषय बदलत) चला सांगावं लवकर काय काय झालं ते.

जोतिबा : हे बघ. आधी तू जी तारेवरची कसरत करते आहेस ती कशी काय चालल्येय ते सांग बघू ! त्यात काही अडथळे निर्माण झाले असले तर त्यांचा बंदोवस्त आधी करायला हवा.

सावित्री : आमचं सगळं काही व्यवस्थित चाललंय, पण......

जोतिबा : हा, हा जो पण आहे ना, त्याच्याच पुढचं ऐकायचंय मला.

सावित्री : तसं काही विशेष नाही, पण......

जोतिबा : आता मात्र मला ही गोष्ट पणालाच लावावी लागेल. तुला जर कोणी त्रास देत असेल तर सांग.

सावित्री . प्रवाहाविरूद्ध पोहायचं म्हणजे त्रास हा होणारच. टवाळखोरांना दुसरा उद्योग काय असतो ? पण मी त्यांच्याकडे लक्षच देत नाही. आपलं काम भलं की आपण भलं.

जोतिबा : पण ते मात्र तुझ्यावर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवत असतील. ज्या दिवशी तू चिडशील, त्रागा करशील तो त्यांच्या विजयाचा दिवस असेल. काळजी करू नकोस, ही सुद्धा एक परिक्षाच आहे, आणि त्यात तू उत्तीर्ण होशील याची मला मनोमन खात्री आहे. सध्या सगळ्यांचं जीवनच अस्थीर झालंय. त्यामुळे टवाळखोरांची पोळी पिकल्ये पण कोणत्याही क्षणी ... (दारावर थाप ऐकू येते) कोण आहे ?

सावित्री : अगोबाई, इतक्या रात्री... (पुन्हा दारावर थाप येते)

जोतिबा : आलो, आलो. कोण आहे ?

मांग : आमी हायेत पावणे मंडळी, लई लांबनं आल्याल हायेत.

( जोतिबा बाहेर येतात. त्यांच्या मागे सावित्री)

धोंडीराम : या, असं मोकळ्यावर या. काय इषेस नाय, सादच काम हाय. झटशिनी उरकुन टाकतो म्हंजी तुमीबी मोकळं नि आमीबी मोकळं.

जोतिबा : इतक्या रात्री काय काम काढलंत ?

मांग : (तलवारी दाखवतात) या वस्तूवरनंबी न्हाई ध्येनात येत आमी कोन हायेत त्ये ?

सावित्री : धनी पुढं जाऊ नका.

मांग : माज्या आई तू फुडं येऊ नगस, नायतर येक्या हाती दोघानलाबी खलास कराया लागल, चल रं बाबा घे द्येवाचं नाव, आमाला अजून दोन सुपाऱ्या हैती, चल आटप झटशिनी, घे द्येवाचं नाव.

जोतिबा : या विश्वाची प्रेरणा म्हणजेच माझा देव-आणि धर्म. त्या देवाला कसलं आलंय नांव आणि गांव.

धोंडीराम : जे काय आसल त्ये उरक आनि हो मरायला तयार. तुजं परवचन नाय ऐकायचं आमास्नी. चल.

जोतिबा : मी तुमचं काय नुकसान केलंय ? म्हणून तुम्ही मला मारणार आहात ? बोला.

मांग : अरं बाबा, तू आमचं कायबी लुकशान नाय क्येलं पर तुला मारला न्हाई तर आमचं मातर लुकशान व्हईल समाजलं ?

जोतिबा : अस्सं, म्हणजे मला मारल्यावर तुमचा फायदा होणार आहे तर.

धोंडीराम : अरं खुळ्या फायद्याबिगार कोन कुनाला मारतो काय ?

मांग : असा तसा नाय, चांगला येक येक हजाराचा सौदा क्येल्येला हाय,

जोतिबा : तसा काही लेखी करार झालाय का ? ज्या कोणी तुम्हाला हे काम सांगितलंय त्यानं तसा काही कागद लिहून दिलाय का तुमच्याजवळ.

धोंडीराम : कागूद कशाला पायजे ? आमची समदी कामं शब्दावर चालतात.

जोतिबा : बाबानो, शब्दावर चालतात ती पुण्यकर्मं, आणि ती होतात सूर्यप्रकाशात. रात्रीच्या अंधारत येऊन मारण्यापेक्षा उद्या भर दुपारी तुम्ही इथं या, नाहीतर तुम्ही सांगाल तिथे मी येतो आणि तिथे खुशाल तुम्ही मला ठार मारा.

मांग : जास्ती बाचाबाची नाय पायजे. ह्यो आमचा धंदा हाये.

जोतिबा : पण या तुमच्या मेहेनतीचा मोबदला तुम्हाला नक्की मिळेलच याची काय शाश्वती आहे ? ज्यानं तुम्हाला हे काम सांगितलंय त्यानंच उद्या काखा-बगला वर केल्या आणि तुम्हाला तुरुंगात पाठवलं तर ?

धोंडीराम : त्यो कशाला तसं करील ? मानूस चांगला हाये.

जोतिबा : तुम्ही कुठं वाईट आहात ? पण उद्या त्याच तुमच्या चांगल्या माणसाला तुमची भिती वाटेल. कारण तुम्हीसुद्धा त्याच्या पापाचे वाटेकरी आहात. तेव्हा तुम्हालासुद्धा आयुष्यातून उठवल्याशिवाय राहणार नाही तो.

धोंडीराम : आमी हायेत आडानी मानसं. आमाला काय बुकातली भासा समजत नाय, आमाला एकच ठाव हाय, मार म्हनलं की मारायचं आनि पैसा भ्येटला का पोटाची सोय करायची.

जोतिबा : अरे ! तुमच्या पोटाच्या सोईसाठी तुम्ही मला मारणार आहात ? मग हे आधी का नाही सांगितलंत ? चला. घरात चला, आधी पोटभर जेवा आणि मग खुशाल मला ठार मारा. सावित्री, याना हातपाय धुवायला पाणी दे. (त्या जातात आणि पाणी घेऊन येतात) हे बघा संकोच करू नका. आपलं घर समजून पोटभर जेवा. नाहीतरी हे घर तुमचंच आहे. ही भूक अत्यंत वाईट आहे बाबानो, या भुकेच्या पोटी माणूस काहीही करायला तयार होतो. या. या. (तो त्यांच्या हातावर पाणी ओतणार इतक्यात)

मांग : नग, नग जोतिदादा, आमी सूद्र-पापी मानसं, आमच्या रक्तानं आमी तुमचे पाय धुवाया पायजे दादा, येकडाव आपल्या आविष्याचं पानी करून आमच्यासारक्या म्हारा मांगाच्या हातावर सोडलं देवा तुमी, पन आमी आंधळे, आमाला नाय दिसलं त्ये. जीव घ्याया आलेल्या मानसाला आन्न खायाला घालनारा मानूस आज पयले बगीतला आमी.

धोंडीराम : कुऱ्हाडीचा दांडा गोतास्नी काळ व्हनार व्हता बगा आज. ज्यांच्या साठनं तुमी दोघानीबी आपलं आविष्य ववाळून टाकलं त्यानला-आमच्या माय-बापानला जीवे मारायला आलो व्हतो आमी. थु:

आमच्या जीनगानीवर. आमास्नी माप करा द्येवां. लेकराचं आपराद पोटात घाला.

(दोघेही तलवारी पायाशी ठेवतात. पाया पडतात.)

मांग : ज्येनी आमाला या कामा साठनं इकत घेतलं व्हतं, त्येचंच डोस्कं उडवतो, त्या साठनं आमी फाशी ग्येलो तरीबी चालल.

जोतिबा : नाही, नाही, असं होऊन नाही चालणार. हा प्रसंग आपणा चौघांना आणि तुमचा जो कोणी धनी आहे; इतक्या जणानाच ठाऊक आहे. तेव्हा याची कुठही वाच्यता करू नका. उद्यापासून रोज इथं या, तुमच्या काही अडचणी असतील तर सावित्रीला सांगा, तुमच्या मुला-बाळांना तिच्या स्वाधीन करा. त्यांची पोटच्या पोरासारखी काळजी घेईल ती. त्यांना लिहा-वाचायला शिकवील.

मांग : मायबाप, तुमच्या जीवावर उटलेल्या त्या राक्षसाला आमी जिता सोडनार नाय.

जोतिबा : नियती त्याला आपोआप शिक्षा करील. निर्मिकाला असंख्य डोळे असतात, अंधारातली पापं माणसाला दिसली नाहीत तरी त्याला मात्र ती स्पष्ट दिसतात. मग तुम्ही कशाला कारणीभूत होता? गरीवाना सदैव गरीब ठेवण्यात आणि त्यांच्या गरीबीचा फायदा घेण्यात जर त्यांना धन्यता वाटत असेल तर आपण गरीब राहू नये. शिकावं, मोठं व्हावं म्हणजे आपोआप अशा प्रवृत्तीचा शेवट होईल.

धोंडीराम : द्येवा, आज पावतर असं सांगनारा कोनबी भ्येटला न्हाई बघा, नायतर ही असली पापं का क्येली असती आमी ?

जोतिबा : तुमचा दोष नाही तो, गरीवीचा आहे. म्हणूनच गरीबांनी लाचारी सोडून, अभिमानी झालं पाहिजे आणि त्यासाठी प्रथम शिक्षण घेतलं पाहिजे, त्याला आहे तुमची तयारी ? बोला

धोंडीराम : मायबाप, आता इक्ती उमर उलटल्यावर कसलं शिक्षान आनि कसलं काय ?

जोतिबा : डोंगरातले ओबडधोबड दगड; कितीतरी वर्ष पडून असतात एकाच ठिकाणी पण त्यातूनच देवाच्या मूर्ती घडवितो मूर्तीकार. या जगात अशक्य असं काहीच नाही. निर्मिकानं प्रत्येकाला उपजिवीकेचे काहीना

काही तरी साधन दिलेलं असतं, पण माणसाला त्याची पारख नसते आणि मग तो भलतंच काहीतरी करून पोट भरत असतो.

धोंडीराम : माय-बाप, आजपासनं सोडले हे धंदे. या धोंड्याला कंच्याबी पाय-ठनीला बसवा पन चार पुन्यवान मानसांचं पाय लागू द्येत या दगडाला.

मांग : माय-बाप, हा रोडे मांग डोस्क्यानं कमी हाय पन धा इस्मास्नी भारी हाय. आपल्याकडं कायबी काम असलं तर त्ये करायची माजी तयारी हाये.

जोतिबा : तुझी कष्ट करायची तयारी असेल तर...

मांग : काय वाटल त्ये सांगा, पन या पायापासनं दूर लोटू नगा, कायच नाय जमलं तरी येक गोष्ट मातर पक्की जमल. या छातीचा कोट करून तुमच्या बाजूला उभा -हाईन द्येवा, तुमच्या क्येसालाबी धक्का लागू द्येनार नाय मी. त्यासाठनं कळीकाळाशी झुंज द्याया लागली तरी माग हाटनार -हाय ह्यो रोडे मांग.

( सावित्रीबाई येतात )

सावित्री : त्यांना म्हणावं हातपाय धुवून घ्या. पानं वाढलीत.

जोतिबा : चला, धोंडीराम, रोडे. माझंही जेवण व्हायचंच आहे अजून. आपण बरोबरच बसू चला.

( तिघंही जेवायला बसतात. हळू हळू काळोख होतो. )

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible]
ग्रा. क्र. २०६५८ नों. दि. ........
वि. नाटक क्र. २९१९२५८

## अंक पहिला – प्रवेश चवथा

(शाळेच्या वाटेवर पाच सहा टोळभैरव वसलेले आहेत. सावित्री-बाईंच्या येण्याची ते वाट बघत आहेत. नारभट त्यांना प्रोत्साहन देत आहे.)

नारभट : अरे आपण आपला प्रयत्न चालूंच ठेवायचा. त्या पाखंड्याचे आणि त्याच्या बायकोचे चाळे असेच चालू ठेवले तर उद्या ही महारं–मांगं आपल्यावर राज्य करतील, आणि यच्चयावत् ब्राह्मणांना त्यांचे पाय चाटीत बसावं लागेल. तेव्हा वेळीच त्या सापाला निर्विष केलं पाहिजे.

१ भट : नारभट, आम्ही गेला महिना त्या बाईला असा काही उच्छेद दिलाय...

वामनभट : अक्षरश: चिखलफेक केली, चिखलफेक.

१ भट : शिव्यांची लाखोली वाहिली.

२ भट : अक्षरश: फाल्गून केला, पण येरे माझ्या मागल्या. परवा तर मी स्वत: तिच्या अंगावर दोन अंडी मारली.

१ भट : चिखल तर रोजच फेकतो आहोत.

२ भट : पण ती तश्शी शाळेत जाते, पण परत येतांना बघावं तर लुगडं आपलं बदललेलं. कृष्णानं द्रौपदीचं बदलावं तसं.

नारभट : मूर्खासारखं बडबडू नकोस. या कलीयुगातला कुठलाही कृष्ण, लुगडं नेसवण्यापेक्षा सोडण्यासाठीच पुढं सरसावेल. नुसती अंडी आणि चिखल यांनी काय होणार आहे ? मूळ विषयाला हात घातला पाहिजे. शिक्षिकेला व्यभिचारी ठरवलं की विद्यार्थिनी आपोआप पळ काढतील. आज ती आली की सरळ तिच्या निरीला हात घाला.

वामनभट : नारभट, ती जबाबदारी आपणचं घ्या. तिचा नवरा लहूजी वस्तादाच्या तालमीत तयार झालाय्. आमची हाडं तरी जाग्यावर ठेवील का तो ?

नारभट : आणि तुम्हाला व्यायामशाळा चालविण्यासाठी मी जे दरमहा अडीचशें रुपये देतोय ते कशासाठी ? माझ्या हाडांचं चूर्ण करण्यासाठी ? तुम्ही तयार केलेले हे, हे तुमचे शिष्य मारुतीसमोर घुमण्यासाठी तयार करून ठेवलेत की काय तुम्ही ?

वामनभट : तसं नाही, पण आपण; भलतंच कांही तरी...

नारभट : गप्प बसा, त्यात कसलं आलंय भलतं सलतं ? आपण कुठल्या ब्राह्मण कुळातल्या गर्त्या बाईच्या तर अंगाला हात लावीत नाही ना ? झालं तर मग. शूद्राची स्त्री ही भाकरीसारखी असते. तिला कुस्करल्याशिवाय राहू नये, समजलं ?

वामनभट : आमच्यासारख्या कुटुंबवत्सल लोकांनी ही असली कामं करायची म्हणजे...

नारभट : तुम्ही कुटुंबवत्सल आहात, तुमच्या पदरात तीन मुलीच आहेत; त्यांची लग्नकार्य अजून व्हायची आहेत. पण या नारभट सावकाराचा हात लागल्याशिवाय कार्य सिद्धीस नेण्यास श्री असमर्थ आहे हे लक्षात आहे ना तुमच्या ? (वामनभटाचा चेहरा पडतो)

२ भट : नारभट, पण हे उपद्व्याप किती दिवस करायचे ?

नारभट : तिचं हे शिक्षणाचं गुऱ्हाळ बंद पडेपर्यंत. तुम्हाला साध्या अकला कशा नाहीत रे ?

१ भट : आमच्या अकला गेल्या शेण खायला पण तुमची तरी शाबुत होती ना ? काटयानं काटा काढणार होतात ना तुम्ही त्याचा ? तो रोडे मांग आणि तो धोंडया गेलेच की नाही तुमच्या तोंडाला पानं पुसून ?

नारभट : तसेच तुम्ही सुद्धा जा त्या नरकाच्या दलदलीत. तेच तुमच्या नशीबात लिहीलेलं असेल तर मला ते टाळता का येणार आहे ? जा. चाटा त्याचे पाय. (सावित्रीबाई येताना दिसतात) आली वाटतं अवदसा. बा कशी अगदी सतीसावित्रीच्या थाटात येतेय. हे बघा, आज भगीरथ प्रयत्न करावे लागले तरी चालतील पण आज तिला तशी सोडू नका. शाळेत पाऊल टाकण्याआधीच (कानात सांगतो) समजलं ना ? आजवर घातलेल्या अन्नाला जागा आणि मर्दासारखे वागा. मी आहेच तुमच्या मागं. (आड उभा राहतो. सावित्रीबाई येतात. कोणीतरी त्यांची पिशवी हिसकतो आणि नाल्यात फेकतो. एक जण ती काढून देण्याचा प्रयत्न करतो)

२ भट : अरे, अरे चिखलानं माखली रे.

१ भट : थांब थांब, पाणी ओततो .. (तो पाणी उडवतो ते सावित्रीबाईच्या अंगावर पडत असते. त्या बऱ्याच भिजतात)

२ भट : अरे, अरे, तुला कांही दिसतंय की नाही ? रस्त्यानं माणूस जातंय; कोण जातंय बघ की रांडेच्या.

१ भट : माणूस काय म्हणतोस टोणग्या, बाई, बाई माणूस म्हण. पहिली-वहिली स्त्री शिक्षिका, वाळवंटात फुलांचे ताटवे फुलवायला निघालेली फुलासारखी टवटवीत.

२ भट : ज्योतिच्या प्रकाशात काव्य करणारी.

१ भट : ट ला ट आणि प ला प लावणारी. साक्षात् वाग्देवता आणि अशा या मंगलमूर्तीला या अमंगल नाल्यातल्या पाण्यानं ओली चिंब करतोस ? (स्वतःच्या तोंडात मारुन घेतो)

२ भट : गाढवा, चुकलो म्हणून पाय धर तिचे

१ भट : चुकलो, चुकलो (जवळ जातो, हात धरतो. सावित्रीबाई तो सोडवण्याचा प्रयत्न करतात) अरे रे, पाण्याच्या शिडकाव्यानं फुलं कशी तरारतात. पण हे फुल मात्र कोमेजून गेलंय, हर हर.

२ भट : चांडाळा, तुझे हात छाटून टाकावेसे वाटतात. हो बाजूला (पुढे सरसावून दुसरा हात धरतो) या हातानं आजपर्यन्त कितीतरी पद्यपंक्तींची उष्टी खरकटी काढली असतील ?

१ भट : (नक्कल करीत) " माझ्या जीवनांत, ज्योतिबा स्वानंद
जैसा मकरंद, कळीतला.
स्वानंद काय ग भवान्ये, दाखवतो हं तुला आमचा मकरंद.

२ भट : (नक्कल करीत) " इंग्रजी शिकूनि, जातीभेद मोडा
भटजी भारुडा, फेकुनिया "
अग सटवे, संस्कृतचा कचका बघितला नाहीस तू अजून.
भटजी भारुडा काय ? (तिच्या निरीला हात घालतो इतक्यात जोतिबा येतात. दोघांच्या माना पकडतात हे पाहून वामनभट पळून जातो)

जोतिबा . वा ! वा रे ब्राह्मण ! तुमच्या मनुस्मृतिनं हेच शिकवलं का तुम्हाला ? रोडे ! (रोडे येतो. त्या दोघाना ते रोडेच्या स्वाधीन करतात) बाय-

कांच्या अब्रूला हात घालण्याचा आटापिटा करण्याबद्दल तुम्हाला जर कोणी दक्षिणा द्यायचं कबूल केलं असेल तर त्या नरपशूला माझा एकच सांगावा द्या, "अक्लेशेन शरीरस्य, कुर्वीत धनसंचयम्" शरिराला त्रास न देता अर्थार्जन करणारी तुझी जात, शूद्रातीशूद्रापेक्षाही हीन आणि नीच पातळीची आहे. रोडे, या दोघांना फरासखान्याकडे घेऊन चला.

(रोडे त्यांना ढकलत नेतो)

१।२ भट : आम्ही आपल्या पाया पडतो, पण आम्हाला...

जोतिबा : आपण साक्षात् भू–देव, आणि आपण माझ्या पाया पडता ? एका शूद्राच्या ?

रोडे : अवं मतलबासाठी कायबी करत्याल ही भुत, तात्या ह्येस्नी चौकीवर नेन्यापक्षी, ह्तिच या दोघांच्या तंगड्या तोडून पांगळं करून ठिवतो.

जोतिबा : नाही रोडे, आपण कायदा नाही हातात घ्यायचा. जा याना फरासखान्यावरच घेऊन जा. (दोघांना नेतो)

सावित्री : आज आपण वेळेवर आला नसतात तर..

जोतिबा : असं कसं होईल सावित्री ? गेले वीस दिवस माझं लक्ष आहे त्यांच्यावर- म्हणजे तुझ्यावर. आपल्या स्वतःच्या घरापासूनच सुधारणेला सुरुवात केल्ये आपण, तेव्हा मी तुझ्याकडे आणि तू माझ्याकडे डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवायला हवे (शाळेची घंटा वाजते) बघ सत्य आहे. जा, आजपासून तुझ्या मार्गातले अडथळे आणि काटेकुटे साफ झालेत अशी खात्री बाळग आणि नव्या उमेदीनं कामाला लाग. (तिला पोचवतात. हळू हळू काळोख होतो. एकटा नारभट प्रकाशात दिसतो)

नारभट : काय करूं रे ! जरासंधाच्या हाडाचे फासे जसे कौरवांना धार्जिणे झाले होते तसे या नियतीचे फासे या फासेपारध्याला धार्जिणे झालेत की काय ? जी जी शक्कल करावी ती ती फोल ठरत्ये, पण मी सुद्धा कांही कमी नाही, माझं नाक कापलं गेलं तरी बेहेत्तर पण या माळ्याच्या अवलादीला अपशकून केल्याशिवाय सोडणार नाही मी.

– अंक पहिला समाप्त –

# अंक दुसरा – प्रवेश पहिला

(न्यायसभेत दोन, तीन प्रतिष्ठीत लोक व पंडीत बसलेले आहेत. इतक्यात घंटा वाजते)

न्यायाधिश : हैबती, बाहेर कोण कोण जमलेत ?

हैबती : रोडे मांग नावाचा एक मांग, आणि धोंडीराम नावाचा एक कुंभार जोतिबा तात्याकडून आल्यालं हैती.

न्यायाधिश : जा. त्यांना आत पाठवून दे (हैबती जातो)

पंडीत : जोतिराव स्वत: आले असते तर बरं झालं असतं.

न्यायाधिश : पंडीत, मला या माणसाच्या उमेदीबद्दल अचंबा वाटतो. हा माणूस विश्रांति तरी केव्हा घेतो ?

पंडीत : आता तर ते शाळांच्या व्यवस्थापक मंडळातूनही निवृत्त झालेत. त्यांच्या स्वत:च्या शाळांकडे जास्त लक्ष देता यावं म्हणून.

न्यायाधिश : त्यांच्या या धडपडीला, कालांतरानं का होईना पण यश आल्याशिवाय रहाणार नाही. (रोडे मांग व धोंडीराम येतात. कपडे व रहाणी स्वच्छ पण खेडवळ) या. या. बसा. (दोघे नमस्कार करून उभेच रहातात)

धोंडीराम : आम्ही उभेच रहातो, आपल्या सान्निध्यात, बसून वार्तालाप करण्याची योग्यता, अजून तरी आम्हाला आलेली नाही. माझं नांव धोंडीराम. शूद्र जातीचा आहे मी.

पंडीत : वा ! हे सांगितलं नसतंत, तर आपण शूद्र आहात यावर कोणीही विश्वास ठेवला नसता.

धोंडीराम : माझा मलाच विश्वास वाटत नाही देवा.

रोडे मांग : आमच्या सारक्या उलट्या काळजाच्या हैवानास्नी मानसात आनलं तात्यासायबानी, त्ये सवता हित येत्यालच. पन

आमी हितं का आलो त्ये धोंडीराम सांगल तुमास्नी. त्या आदूगर हृयें तुमच्या ताब्यात घ्या. (कापडात गुंडाळलेल्या दोन तलवारी पुढे ठेवतो)

धोंडीराम : जोतिरावांच्या विरुद्ध, समस्त पुण्य नगरीतल्या ब्राह्मण वर्गानं जो वणवा पेटवलाय ... त्याला ..

न्यायाधिश . त्याला कांही ब्राह्मणच जबाबदार असतील, असं जरी मानलं, तरी जोतिरावानी आपल्या तोंडून आपली बाजू मांडल्याशिवाय–

धोंडीराम : आपल्या बहिणीच्या डोक्यावर वस्तरा चालवूं नका, भ्रूण हत्या करूं नका, माणसाला माणसासारखं वागवा, या गोष्टी न बोलता अंगीकारता येतात. त्यासाठी जोतिरावांनी इथं येऊन त्या सांगण्याची काय गरज आहे ?

पंडीत : परंपरेनं चालत आलेल्या रूढी, सहजासहजी नामशेष होत नाहीत हे तर तुम्हाला पटतं ना ? अहो अक्सीर उपायानं गुण यायलासुद्धा वेळ हा लागतोच.

न्यायाधिश . जोतिरावांच्या लिखाणावरून बोलायचं झालं, तर बळीराजापासून आजतागायत ज्या इष्टानिष्ट रूढी चालत आलेल्या आहेत त्या अशा एकाएकी कशा पुसल्या जातील ?

धोंडीराम : त्यासाठीच ही पायाभरणी केल्ये त्यांनी. आज ना उद्या या सोपा-नाच्या पायऱ्या सुवर्ण मंदिरापर्यंत पोचल्याशिवाय राहणार नाहीत.

न्यायाधिश . जोतिरावांनी तुम्हा दोघांवर चांगले संस्कार केलेत हे तुमच्या बोलण्या चालण्यावरून सिद्ध होतंय, पण समाजासाठी त्यांनी काय केलंय ? त्यांच्या विचारसरणीप्रमाणे सगळे शूद्रातिशूद्र शिक्षण घेऊन उद्या ब्राह्मणांच्या जागी बसले तरी त्यावेळी ते गुण्या गोविंदाने वागतील याची काय शाश्वती ?

रोडे मांग : तसं कसं व्हयील ? येकदा दुधानं तोंड भाजलं म्हंजी ताक बी फूंकरुन पित्यात मानसं.

धोंडीराम : शूद्रांना शिक्षण देऊ नये असा उपदेश करणारे ग्रंथ आणि विचार-सरणी कोणत्याही देशाची प्रगति करू शकणार नाही. अनिष्ट परंपरेबद्दल बंड होणार नसेल तर माणसाचं जीवन कुजून जाईल. देवाच्या पुजेसाठी आणि लग्नकार्यासाठी पुरोहिताच्या मध्यस्थीची

जरूरी नाही हे आम्हाला अगदी मनोमन पटलेलं आहे. म्हणून असल्या मध्यस्थांशिवाय लग्न लावणं हे कायदेशीर ठरवून तळेगावची केस जिंकली त्यांनी.

न्यायाधिश : ते आम्हाला माहित आहे. ज्यांना तो मार्ग पटेल ते त्याचा अवलंब करतील, पण त्याच बरोबर एक मध्यस्थ जाऊन त्याची जागा दुसरा कोणीतरी भरून काढल्याशिवाय रहाणार नाही. मग आलेल्या नव्या मध्यस्थाच्या वागणूकीचे परिणाम आणि दुष्परिणाम तो आपल्यापैकीच एक आहे असं म्हणून निमूटपणे सहन करावे लागतील याचाही विचार त्यांनी करायला हवा.

पंडीत : पुरोहिताच्या जागी आपल्यातलाच एखादा मार्गदर्शक नेमून त्याच्या हातात कार्य सिद्धीस नेण्याची सूत्रं बहाल केली आणि त्यानंही पुरोहिताचाच कित्ता गिरवायला सुरूवात केली तर काय होईल ? कार्य सिद्धीस जाईल पण ते थोडया धुसफुशीनं, केवळ भटजी आणि त्यांचे वैदिक मंत्राशिवाय पार पडलेलं कार्य एवढं एकच नाविन्य असेल त्यात इतकंच.

रोडे मांग : आमच्याकडच्या लग्नकारयात, आनि पुंजेच्या वक्ती बामन खरे मंत्र म्हनत्यात का काय म्हणत्यात त्ये आमास्नी कुटं कळतंय ? त्या पक्षी मंत्र नको नी तंत्र नको, देवाच्या पुंजेसाठी हे दोन हात आनि ह्ये डोस्कं आसलं का काम झालं.

धोंडीराम : तात्यांनी आपल्या, ब्राह्मणांचे कसब, सार्वजनिक सत्यधर्म, शेतकऱ्यांचा आसूड, पोवाडे, नाटकं या सगळया वाङमयातून या सगळया गोष्टींचा उहापोह केलेला आहे.

न्यायाधिश : आम्ही त्यांचं समग्र साहित्य वाचलेलं आहे आणि अजून वाचतो आहोत. सत्कार आणि दीनबंधू या वृत्तपत्रातून येणारे त्यांचे लेख, आम्ही न विसरता वाचतो. दीनबंधूचे संपादक, ठाण्याचे नारायण मेघजी लोखंडे, त्यांचे स्नेही आहेत तसे आमचेही ते स्नेही आहेत. जोतिरावांच्या कार्याबद्दल आम्हाला नितांत आदर आहे. पण कर्तव्यात आणि न्यायदानात आम्ही निष्ठूर आहोत.

धोंडीराम : जोतिरावांनी स्वतः इथं येऊन जबानी दिली तर आपलं समाधान होणार असेल तर मी त्यांना तशी विनंती करतो.

न्यायाधिश : जबानी म्हणू नका. हे काही कोर्ट नाही. ही न्यायसभा आहे. त्यांनी माझ्याबरोबर मनमोकळेपणानं चर्चा करावी. त्यानंतर योग्य ते साक्षीपुरावे गोळा करूनच आम्ही योग्य तो निर्णय देऊ.

धोंडीराम : ठीक आहे. आम्हाला अनुज्ञा द्यावी. आम्ही त्यांच्या कानावर ही गोष्ट घालतो. (दोघे जातात)

न्यायाधिश : पंडीत, पाहिलंत ! परीसाच्या स्पर्शानं लोखंडाचं सोनं होतं हा दृष्टांत, सत्य स्वरूपात बघायला मिळाल्याचं हे एक बावनकशी उदाहरण आहे.

(हळूहळू काळोख होतो. दृश्य बदलते)

## अंक दुसरा -- प्रवेश दुसरा

(जोतिबा व धोंडीराम नदीकाठी एका दगडी चौथऱ्यावर बोलत बसले आहेत. वेळ पहाटे ५ ते ६ ची)

धोंडीराम : तात्यासाहेब, आपलं "तृतीयरत्न" हे नाटक काल दुपारी मी वाचलं आणि तेव्हापासून...

जोतिबा : डोकं गरगरायला लागलं असंच ना ? म्हणूनच आधी मी तुला सगळी पुराणं वाचायला दिली होती.

धोंडीराम : "ब्राह्मणोऽस्य मुखमासी, द्वाहूराज्यन्यः कृतः। उरूतदस्ययुद्वैश्यः पदभ्यांशूद्रो अजायत ।। ज्याच्या तोंडापासून ब्राह्मण आणि पाया पासून शूद्र निर्माण झाले असा तो आदीनारायण असेल तरी कसा ?

जोतिबा : ते त्यांना तरी कुठे समजलंय ? प्रत्यक्ष त्यांच्या बेंबीतून जन्म घेणाऱ्या त्या ब्रह्मदेवालाही त्या आदीनारायणाचं दर्शन झालेलं नाही. त्याला त्या शेषावर उताणा घालून त्याच्या बेंबीतून चारतोंडाचा ब्रह्मदेव नावाचा प्राणी जन्माला घाल्ण्याचं मायाजाल केवळ ब्राह्मणेतरांना भेडसावण्यासाठी निर्माण करून ठेवलंय या भूदेवांनी.

धोंडीराम : मग मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह यांच्या बाबतीतसुद्धा असंच काहीतरी गौडबंगाल असेल.

जोतिबा : हळू हळू समजेलच तुला ते. ज्ञानाची कवाडं उघडण्यासाठी विद्येच्या गुरुकिल्लीचाच उपयोग केला पाहिजे. पण हे शूद्रांना आणि अति-शूद्रांना कळलं नाही आणि या भूदेवांनी त्यांना हे कसोशीनं कळूनही दिलं नाही. निर्मिकानं जन्माला घालतांना मानव म्हणूनच जन्माला

घातलंय प्रत्येकाला. उच्च आणि नीच हे भेद, ब्राह्मणांनी आपल्या भाराभर ग्रंथांच्या आधारानं दस्यूंच्या मनावर बिंबवल्यामुळं आजतागायत त्यांना खितपत पडावं लागलंय. प्राप्त झालेल्या मानवजन्माच सार्थक करून घेणं आणि दुसऱ्याच्या उपयोगी पडणं, मानव कल्याणासाठी देह झिजवणं .. (एका स्त्रीचा आवाज ऐकू येतो, " आई, आई गंगा माई, या तुझ्या अभागी मुलीला आपल्या पदरात घे." जोतिबा धावत जाऊन तिला अडवतात. ती त्यांच्यापासून बाजूला होते.) मुली कोण आहेस तू ? आत्महत्या हा गुन्हा आहे बाळ.

स्त्री आत्महत्या करू नको तर काय करू ? विधवांना या जगात जगण्याचा अधिकार नाही. त्यातून माझ्यासारख्या सवत्स विधवेला तर हा समाज जिवंत जाळून टाकल्याशिवाय रहाणार नाही. संभावितपणाचा बुरखा पांघरलेल्या या नराधमांच्या राज्यात, स्त्री ही उपभोगासाठी असते आणि विधवा ही बलात्कारासाठीच असते. कोणीही यावं आणि आपली कामवासना शमवून खुश्शाल तिला दुसऱ्याच्या हातात सोडून द्यावी, असल्या पुरुषांच्या राज्यात ..

जोतिबा : मुली सगळ्या पुरुषांना एकाच मापानं तोलू नकोस.

स्त्री : हं ! माणूसकी असलेला एक जरी पुरुष मला भेटला असता तर मी त्याचे पाय धरले असते. मला भेटलेले लांडगे, केवळ माझ्या शरिराचे लचके तोडण्यासाठीच माझ्याजवळ आले होते.

जोतिबा : अशा लांडग्यांच्या पुढ्यात शेळी बनून राहिलीस त्याचे परिणाम भोगलेस तू. वाघीण बनली असतीस तर त्यांना चांगला धडा शिकवला असतास. मुली माझं ऐक (जवळ जातात)

स्त्री : दूर व्हा ! या पुढं कुठल्याही पुरुषाच्या वक्तव्यावर मी मुळीच विश्वास ठेवणार नाही. आपला कार्यभाग साधून घेण्यासाठी, गोड बोलाची साखरपेरणी करणारे पुरुष, कुठल्या उद्देशाने विधवेजवळ येतात हे पुरतेपणी कळून चुकलंय मला.

जोतिबा : मुली तू जगावीस, आपल्या पायावर उभी रहावीस, तुझ्या पोटी येणाऱ्या त्या निष्पाप जिवाला तू वाढवावंस, मोठं करावंस आणि या बुरसटलेल्या समाजाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालावंस...

स्त्री पुरे, पुरे, तात्पर्य काय तर येनकेन प्रकारेण मी तुझ्या मगरमिठीत

सापडावं. एका नराधमाच्या पुरुषार्थाचं ओझं मी उदरात वहाते आहे हे उघडया डोळयांनी बघतोयस तरी

जोतिबा : तेच ओझं हलकं करण्यासाठी हा जोतिबा फुले तुला विनवणी करतोय मुली.

स्त्री : जोतिबा फुले ! क्षमा करा, लहान तोंडी मोठा घास घेऊन तोंडाला येईल ते बोलले. पण त्याला माझा नाईलाज होता. आपलं आणि सावित्री काकूंचं नाव मी बऱ्याचदा ऐकलंय, आपण अनेक विधवांना आपुलकीनं आसरा दिलात. माझ्यासारख्या वाट चुकलेल्या आणि अति प्रसंगाला बळी पडलेल्या अनेक विधवांची सावित्री काकूंनी उजळमाथ्यानं सुटका केली. त्यांच्या मुलांना पोटच्या मुलांसारखं वाढवलं, शिकवलं, मोठं केलं त्याबद्दल परमेश्वरानं तुम्हां दोघांना उदंड आयुष्य द्यावं, पण मला माझ्याच मार्गानं जाऊ द्या. त्यात अडथळा आणू नका, मी तुमच्या पाया पडते. ज्या बालकाला पित्याचं नांव नाही, असा जीव मी या जगात आणावाच कशासाठी ? त्यापेक्षा त्याच्या बरोबर मीही

जोतिबा : आम्हाला उदंड आयुष्य लाभो अशी त्या निर्मिकाजवळ विनंती केलीस ती काय तुझ्यासारख्या निरपराध मुलींच्या आत्महत्या आणि सतींच्या भडकलेल्या चिता ; उघडया डोळयांनी पहाण्यासाठी ? तुझ्या पोटी येणाऱ्या त्या बालकाला पित्याचं छत्र देण्याचा दृढ निश्चय करूनच हा जोतिबा तुला सावित्रीच्या स्वाधीन करणार आहे. तू कुणाची लेक किंवा सून आहेस, तुझा ठावठिकाणा काय आहे याबद्दल मी तुला एकही प्रश्न विचारणार नाही. मुलीचं पहिलं बाळंतपण माहेरी करण्याची प्रथा आहे असं म्हणतात ना ? तेव्हा मी तुला बाळंतपणासाठी माहेरी न्यायला आलो आहे असं समज. (तिच्याजवळ जातात)

स्त्री : (रडते आणि त्यांच्या पाया पडते) जन्मदात्यांनी केलं नसतं ते तुम्ही करायला तयार झालात, या अभागिनीला, शरिरानं अशुद्ध झालेल्या या काशीला पदरात घ्यायला तयार झालात

जोतिबा : गंगेच्या प्रवाहानं पावन झालेली काशी, अशुद्ध कशी असेल. चल. (तिचे डोळे पुसतात) आता या गंगा–यमुना एकदम बंद. स्त्री ही अबला नसून प्रबला आहे हे जगाला दाखवून देण्यासाठी कंबर कसून उभी रहा. चल हो पुढे.

(तिला घेऊन जातात न जातात तेवढ्यात नारभट आणि त्याचे दोन साथीदार प्रवेश करतात.)

नारभट : गाढवांनो, तुमच्या डोळ्यादेखत तो तिला घेऊन जातोय आणि तुम्ही डोळ्याच्या कवड्या करून बघत बसता ?

१ भट : आमच्या बरोबर तुम्ही सुद्धा बघतच बसला होतात ना ? आम्ही काय हुकूमाचे ताबेदार, ती घरातून पळाली हे तुम्हाला कळल्यावर तुम्ही आम्हाला कळवेपर्यंत, बाईच काय पण एखादा सुरवंट सुद्धा गोगलगाईला घेऊन पुण्याची हद्द सहज ओलांडील.

नारभट : बैला, जास्त अकलेचे तारे तोडू नकोस.

२ भट : पहेलवानाला अक्कल नसते असं तुम्हीच म्हणता ना ?

नारभट : शहाणपणा बंद कर.

१ भट : कमावलेल्या शरिरावर डोकं नसून शहाळं असतं असं आपणच म्हणता ना ?

नारभट : त्या वामन भटानं तुम्हाला नुसते बैलासारखे माजवून ठेवलेत दुसरं काही नाही.

१ भट : ठीक आहे. आता पुढचा कार्यक्रम काय आहे तो सांगा आणि या बैलांना दाणावैरणीसाठी... (पैशाची खूण करतो)

नारभट : बास, येऊन जाऊन पैसा, पैसा आणि पैसा. (पिशवीतून पांच पांच रुपये काढून त्यांच्या हातावर ठेवतो)

१ भट : सावकार, हल्ली बऱ्याच दिवसात मोहोर बघितली नाही. सुरती रुपयावरच कारभार चाललाय. नाही म्हणजे आपली आर्थिक परि-स्थिती जर

नारभट : गप्प बैस, सांगितलेली कामं नीट करू नका आणि मला खड्ड्यात लोटा.

२ भट : त्याचा दर वेगळा पडेल. तो त्यावेळी सांगू आम्ही. या पांच रुपयांची विल्हेवाट कशी काय लावायची ती सांगा.

नारभट : गावात बोंबाबोंब करायची की, त्या हरामखोरानं ..

१ भट : म्हणजे जोतिबानं.

नारभट : नाही. तुझ्या बाप्सानं.

१ भट : चिडता कशाला ? ऐका, त्या जोतिबा फुल्यानं, ब्राम्हणाच्या घरातली एक तरुण, सुरेख आणि गरोदर विधवा आपल्या घरात आणून ठेवलेली आहे. यापूर्वी, इतर जातीच्या अशाच विधवांची पोटं रिकामी

करून हा चांडाळ स्वतःचं पोट जाळतो आहे. आणि त्याची बायको सतिसावित्रीच्या थाटात त्याला साथ देत आहे. हा अधर्म आहे. पाप आहे, वेदांचा अपमान आहे.

२ भट : आम्ही त्या ब्राह्मण विधवेला शुद्ध करून घेण्यास तयार आहोत पण या जोतिबाच्या पंजातून ती सुटेल तेव्हा ना ?

१ भट : अशा विधवांना शुद्ध करण्यासाठी स्वत: शंकराचार्य जातिनं उपस्थित रहातात. त्या विधवेला एका आंब्याच्या झाडाच्या ढोलीत बसवून बाहेरून आग लावून त्याची धग तिच्या गर्भात असलेल्या त्या कारट्याला लागली की बाळ आणि त्याची माता या दोघांची शुद्धी होते.

२ भट : अशा कितीतरी विधवा आपल्या कुकर्माच्या धगीनं ताऊन सुलाखून भरल्या पोटानं हरीचरणी विलीन होत आहेत.

१ भट : हे व्यवस्थित पाठ झालंय. यांत कांही सुधारणा हवी असेल तर सांगा.

नारभट : किर्तन–प्रवचनातून जे जे ब्राह्मण भेटतील त्यांना सांगायचं की 'तुम्ही आपल्या लेकी सूना त्या चांडाळाकडे पाठवा.'

१ भट : ते तुम्ही सांगा.

नारभट : का ? तुम्हाला मी जो पैसा मोजतोय तो कशासाठी ? चांगले एकशे दहा उडाणटप्पू, खुराक घालून माजवून ठेवलेत ते काय लंगोट लावून कुस्त्या खेळण्यासाठी ?

२ भट : त्याबद्दल आम्ही तुमचे आभारी आहोत. पण आमच्या बोंबाबोंबीला प्रतिसाद कितपत मिळेल याबद्दल आम्ही जरा साशंक आहोत. म्हणून...

नारभट : मूर्खांनो, अत्तराचा वास दरवळायला वेळ लागतो पण मैल्याची दुर्गंधी एका क्षणात पसरते. (आणखी पैसे देतो) हं हे घ्या. तुम्हाला जमेल तेवढी आग लावा. वाऱ्यावर सोडून दिलेल्या वायांचा कुठं आणि कसा उपयोग करून घ्यायचा हे मला पक्कं ठाऊक आहे. तुम्ही लोकांच्या कानात हे विष ओतलंत म्हणजे पुण्यातल्या ब्राह्मणांना खडबडून जाग येईल आणि ब्राह्मणातला परशुराम एकदा का जागा झाला की त्याला आवरणं परमेश्वराला सुद्धा जमणार नाही.

(एकटा नारभट प्रकाशात दिसत असतो. त्याच्या वरचा प्रकाश नाहीसा होता होता सावित्रीबाई प्रकाशात दिसू लागतात)

# अंक दुसरा -- प्रवेश तिसरा

(जोतिबाचे घर, सावित्रीबाई आपल्या एक नवविवाहित विद्यार्थिनीची ओटी भरीत आहेत. तिचा नवरा बाजूला बसलेला आहे.)

लक्ष्मी : काकू, पुन्हा आपली लवकर भेट होईल याची खात्री नाही देता येत.

सावित्री : असं कसं होईल ? कोणीतरी सोबत मिळेलच की, आणि वर्षातून एकदा तुला माहेरी पाठवल्याशिवाय कसा राहील तो ! काय रे केशव.

केशव : आम्ही मिलीटरीवाले, बारा महिने तेरा काळ सरकारच्या स्वाधीन असतो. म्हणून म्हणत असेल ती, आणि हिच्या सारख्या शिकल्या-सवरलेल्या मुलीला कशाला पाहिजे कुणाची सोबत ? मराठीबद्दल बोलायलाच नको पण इंग्रजी सुद्धा असं बोलते की समोरच्या माण-साला घाम फुटतो.

लक्ष्मी : आमच्या वेळच्या सगळ्याच विद्यार्थिनींना काकूंनी आणि आऊबाईंनी पक्क तयार करून घेतलं होतं. काकू, पण त्यातल्या त्यात सुमती मोकाशी आणि माधवी थत्तेच जास्त फ्ल्यूएंट बोलायच्या नाही ?

सावित्री : त्यांच्या आई वडिलांना, आपल्या मुलींनी शिकावं याची आच होती आणि त्या दोघीही तल्लख होत्या. गेल्याच महिन्यात माधवी आली होती. रत्नागिरीला असते हल्ली.

लक्ष्मी : सोनू पवार कुठं असते हो काकू ? बिचारी.

सावित्री : अजूनही बिचारीच आहे ती, शिरूरच्या शाळेची जबाबदारी घेतल्येय तिनं स्वखुषीनं. काय ग तिला बिचारी म्हणतेस, आणि तू काय

होतीस ? केशव, १८४८ सालचं हिचं ध्यान बघायला हवं होतंस तू. अभ्यासाच्या नावानं पूज्य, सारखी पाटीवर चित्र काढायची. बंदूक हातात घेतलेल्या शिपायाचं.

केशव : तिच्या नशिबात सैनिकच लिहिला होता म्हणून असेल. काकू उशीर झालाय निघू आम्ही ? ( दोघं वाकून नमस्कार करतात )

सावित्री : संभाळून जा. आय वुइश यु हॅपी जर्नी.

लक्ष्मी : (हुंदका देत) थँक्यु व्हेरी मच काकू, थँक्यू व्हेरी मच.
( त्यांचं हे इंग्रजी संभाषण सुरू असतानाच जोतिबा काशिबाईला घेऊन दारात आलेले असतात)

जोतिबा : मी चुकून एखाद्या ब्रिटीशाच्या घरात तर आलो नाही ना ?
(ते दोघे जोतिबाच्या पाया पडतात) लक्ष्मी ? केव्हा आलीस पोरी ? काय केशवराव, कसं काय ?

केशव : शिरवळला गेलो होतो, कुलदैवताच्या पाया पडायला, येताना केसूर्डीला आणि नायगावला जाऊन आलो...

जोतिबा : आणि आता पठाणकोटला निघाला, चार दिवस राहिला असतात दोघं तर काय बिघडलं असतं ?

लक्ष्मी : तात्या, एकदा ड्यूटी फर्स्ट म्हटलं की तिथं अपील नाही. त्यातून यांची चाकरी पडली ब्रिटीश सरकारची. म्हणजे तिथं डीग्नीटी आली. डीसीप्लीन आली. डॅश आला.

जोतिबा : व्हेरी करेक्ट. नो मॅन कॅन सर्व्ह टू मास्टर्स. बरं, संभाळून जा. (दोघे जातात) डीसिप्लीनचं बाळकडू आऊनी मला पाजलं नसतं तर मला काहीच करता आलं नसतं, आणि तू जर कंबर कसून माझ्या बरोवर उभी राहिली नसतीस तर ..

सावित्री : मी जन्मभरच काय सात जन्म उभी रहायला तयार आहे. पण या पाहुणीला किती वेळ अशी उभी करून ठेवणार आहात ? ये बैस बाळ. ( तिला बसवतात )

जोतिबा : सावित्री, हिचं नांव काशी, तुझी आणि माझी मुलगी. मुळा-मुठेच्या काठावर उभी राहून...

सावित्री : आत्महत्या करणार होतीस ? या अशा अवस्थेत ?

काशी : दुसरं काय करणार होते मी ?

सावित्री : अशा प्रसंगाला तोंड देण्यासाठीच यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केलेली आहे. तुझ्या सारख्या बऱ्याच मुलींची या माझ्या हातांनी सुटका केल्ये मी. कांही काळजी करूं नकोस. इथं तुझ्या केसालाही धक्का लागणार नाही याची खात्री बाळग.

जोतिबा : काशी, आम्हाला मुलबाळ नाही हे त्या निर्मिकाला ठाऊक आहे म्हणूनच त्यानं हा योग घडवून आणला आहे. इतक्या यातना आणि दुःख सहन करून तुझ्या पोटी जो पुत्र जन्माला येईल तो खरोखरच यशवान असेल. सावित्री, त्याचं बारसं आपण अगदी थाटात करायचं. आधी करंडा घेऊन ये आणि तिला कुंकू लाव जा.

काशी : कुंकू ? पण मी.... मला ....

सावित्री : विधवेनं कुंकू लावू नये असं शास्त्र जर तू कुठं ऐकलं असलंस तर ते एक थोतांड आहे. विधवेला कुरुप करण्याच्या ज्या कांही युक्त्या आपल्या समाजानं शोधून काढलेल्या आहेत, त्याची सुरुवात आहे ती. ( स्वतःच्या कपाळावरचं कुंकू तिला लावतात.) चल, शांत चित्तानं विश्रांति घे.

काशी : माझ्यामुळे आमची ब्राह्मण मंडळी तुमचा छळ करतील. तुम्हाला वाळीत सुद्धा टाकतील.

जोतिबा : गेली कित्येक युगं वाळीत टाकून आमचा छळ करताहेत ते. त्यांनी जरी आम्हाला वाळीत टाकलं तरी आम्ही मात्र तुला कधीही अंतर देणार नाही.

काशी : आपल्यासारख्या देवमाणसानी मला पदरात घेतलं याबद्दल मी आपली जन्माची ऋणी आहे. पण माझ्या पोटी येणाऱ्या जिवाला, त्याच्या वडीलांचं नांव उजळ माथ्याने सांगता येणार नाही याचंच दुःख टोचतंय मला.

सावित्री : अग वेडे आम्ही त्याला दत्तक घेणार आहोत. आमच्या घराण्याचा कुलदिपक देणार आहेस तू आम्हाला.

जोतिबा तेव्हा अगदी उजळ माथ्यानं, यशवंत जोतिबा फुले असंच नांव लावील तो.

काशी : (रडत) तात्या, काकू तुमचे उपकार कसे मानू मी !

सावित्री : अग उपकार तुझेच झालेत आमच्यावर, आता यापुढं रडणं एकदम

बंद. नेहमी हसतमुख रहायचं कळलं ? चल, आज माझ्या हातानं मी तुझी वेणी-फणी करते, तुला न्हायला घालते.
(दोघी जातात. जोतिबा स्वतःशीच विचार करतात)

जोतिबा : हर हर काय ही स्त्री जातीची हेळसांड ! ज्या स्त्रीनं नऊ महिने ज्याचं ओझं आपल्या उदरात वागवलं तोच पुरुष, कालांतरानं आपल्या जन्मदात्रीला ओळखेनासा होतो ? त्याच उदरातून जन्माला आलेल्या आपल्या बहिणीला आणि प्रत्यक्ष त्याच्याच स्वतःच्या मुलीला सुद्धा, स्त्रीची जात लवाड आहे असा शिक्का मारून मोकळा होतो ? (रोडे मांग हातात एक पुस्तक घेऊन येतो) ये, ये, आज कसलं शंका समाधान करून घ्यायचं आहे बोल.

रोडे : हातात पुस्तक आहे पण ते आपल्यासाठी आहे. तुकारामतात्या पडवळांनी दिलंय ते आपल्याला देण्यासाठी. तेच येणार होते पण जरा गडबडीत होते म्हणून... (पुस्तक देतो)

जोतिबा : 'जातिभेद विवेकसार' आवृत्ती दुसरी ! वा ! पहिली आवृत्ती झटपट संपलेली दिसतेय ? (धोंडीराम धावत येतो) ये, काय रे इतका धावत कां आलास ?

धोंडीराम : एक अशुभ बातमी सांगण्याची वेळ माझ्यावर आल्ये तात्यासाहेब.

जोतिबा : शुभ आणि अशुभ, मानण्यावर आहे धोंडीराम. आऊनं जाताना हेच शेवटचे चार शब्द मला सांगितले, आणि मला सोडून गेली ती. असो, तू ज्याला अशुभ ही संज्ञा देत आहेस ते सांगायला किंचितही संकोच करु नकोस.

धोंडीराम : तात्यासाहेब, एका घटकेपूर्वी आपल्या वडीलांना, गोविंदरावांना देवाज्ञा झाली. (प्रकाशात एकटे जोतिबा दिसतात आणि पार्श्व-संगीतात 'धीर असल्याने प्रसंग पडता, निर्धारे वर्तता यश येई ।। निश्चयाने जे का हिम्मत धरिती, संकटे वारीती जगा माजी ।। या अखंडाचे शब्द ऐकू येतात व हळू हळू काळोख होऊन दुसरीकडे रोडे मांग पाणी वाटताना दिसतो व दवंडी ऐकू येते.)

"ऐका हो ऐका, मायबाप जोतिबा फुले तात्यांनी, समद्या महार-मांगासाठी आणि तान्हेल्या जिवांसाठी आपल्या घरातला पान्याचा हौद, खुला क्येला हाये होऽऽ" (मागील भागात माणसांची पाण्यासाठी गर्दी दिसते. जोतिबा अणि सावित्रीबाई शेजारी उभे आहेत. त्यांच्या

हातात भाकऱ्यांची टोपली आहे. पुढील भागात रोडे व धर्मा यांचे दृश्य सुरू.)

धर्मा : रोडे दादा, जरा या खापरात वाईच पानी घे रे बाबा (पुढे करतो)

रोडे : अरे यात पाणी टिकायला जरा तरी जागा आहे का ?

धर्मा : नशिबच फुटलं तिथं त्ये तरी काय करनार ? (ओंजळ पसरतो) हं, वता हातावरच वता.

रोडे : घे अगदी पोटभर पी (ओततो) तान्हेल्या प्रत्येक प्राणीमात्रासाठी हौद खुला केलाय जोतिबा तात्यानी. झालं समाधान ?

धर्मा : द्येव त्याचं कल्यान करील. गुदस्ता दुष्काळ पडला व्हता त्या वक्तीबी त्येनी आनि त्येंच्या कारभारनीनं, आमच्या सारख्या गोरगरीबास्नी जगीवलय, त्याचं उपकार या जन्मात बी फ्येडता यायचं नाहीत आमास्नी.

रोडे : खरं आहे तुझं. अशी माणसं शंभर वर्षानी एकदाच जन्म घेतात.

धर्मा : नायतर आमची पुन्याची बामनं ? येखांद्या म्हाराची सावली अंगावर पडली तर धा येळा अंघुळ करत्याल, पन तान्हनं कुनाचा जीव जात असल तर चुळकाभर पानीबी नाय ग्येटनार त्येंच्या हातनं.

रोडे : अरे आता संपत आले त्यांचे दिवस.

( सावित्रीबाई भाकऱ्याची टोपली घेऊन येतात.)

धर्मा : माय दोन दिस झालं पोरांच्या पोटात काय नाय, प्येजेसाठनं मुठभर तांदूळ भ्येटतील का ? द्येव माजं आविष्य दिल तुला.

सावित्री : तांदूळ देते, पण आधी इथं बसून ही भाकरी खा बघू.

धर्मा : माय, पोराबाळांच्या तोंडात चार घास घातल्याबिगर माज्या नरड्याखाली घास कसा उतरंल, दे माय, दे बांदून घ्येतो.

(सावित्रीबाई त्याच्या हातावर चार भाकऱ्या ठेवते आणि आत जाते. धर्मा आपल्या फाटक्या कपड्यात त्या बांधायचा प्रयत्न करीत असतो पण ते जमत नाही. जोतिबा ते पहातात आणि अंगावरचं उपरण काढतात)

जोतिबा : धर्मा थांब थांब. अरे काय ही दशा झाल्ये तुझी ? (उपरण्यात भाकऱ्या बांधायला लागतात तोच सावित्रीबाई ओंजळभर तांदूळ घेऊन येतात) आण आण याच्यातच बांधून देतो. (बांधतात, बोचकं त्याच्या

हातात देतात.) धर्मा, तुझ्या मुलांना शाळेत पाठव म्हणून किती वेळा सांगितलं तुला ?

धर्मा : माय-बाप त्येंच्या अंगावर बोटभर चिंदी नाय, मोठ्याला हमेशा ढास लागती आणि धाकला हगवनीनं मराया टेकल्येला हाय.

जोतिबा : आज संध्याकाळी मी स्वतः त्यांना डॉक्टरांकडं घेऊन जाईन. तू काळजी करूं नकोस. हे बघ या पुढं दिवसे दिवस पाण्याची टंचाई वाढत जाणार आहे. तेव्हा जीव जगवण्यासाठीच त्याचा उपयोग करायला हवा. तू उद्यापासून इथं ये आणि रोडेला मदत कर. मुलांची जबाबदारी मी घेतो समजलं ?

धर्मा : (पायावर डोकं ठेवतो) द्येव तुमचं दोगांचं कल्यान करील. (जातो)

जोतिबा : सावित्री, धोंडीराम मुंबईहून इंदूप्रकाश प्रेसमधून 'ब्राह्मणांचे कसब' ची प्रुफं घेऊन येईल तेवढी तपासून ठेवलीस तर बरं होईल. मला आज संध्याकाळपर्यंत मुळीच वेळ मिळणार नाही म्हणून...

सावित्री : धोंडीराम पहाटेच घेऊन आलाय ती आणि मी ती तपासूनसुद्धा ठेवल्येत.

जोतिबा : वा ! बरं, तो कुठं गेलाय ?

सावित्री : त्याचं आज प्रवचन आहे कुठं तरी; धर्मसिंधूवर.

जोतिबा : सावित्री, धोंडीरामच्या या अल्पकाळातल्या प्रगतिवरून, कांही दिवसानी पुण्याची पोखरण त्याला कमी पडेल असं वाटतंय मला. त्याला बनारसला पाठवण्याचं आहे माझ्या मनात. तुझं काय मत आहे ?

सावित्री : संकल्प आणि सिद्धी या दोन्ही गोष्टी आपल्याच हातात आहेत. तसं पत्र लिहू कां बनारस विद्यापीठाला ?

जोतिबा : अवश्य लिही.

सावित्री : बरं. चार घास खाऊन घ्या बघू आतां मी पान वाढते (जातात)

जोतिबा : रोडे, इतर काय हालहवाल आहे ?

रोडे : हालच आहेत. दाढ्या करायला न्हावी येत नाहीत म्हणून भटांचे हाल चालू आहेत, असं म्हणतायत ते.

जोतिबा : विधवांच्या डोक्यावरचे केस काढण्याची रूढी थांबवतो असा हवाला द्यायला तयार आहेत का ते ?

रोडे : सुंभ जळला तरी पीळ थोडाच जळणार आहे ? गेले कांही दिवस परस्परांची करताहेत, बीन पाण्यानी, मग बायाबापड्यांची हजामत करायला मागंपुढं थोडेच पहाणार आहेत !

जोतिबा : तू असं कर, बुधवारात न्हावी कमिटीत जाऊन ग्यानबाची भेट घे, आणि त्याला सांग आज संध्याकाळी सत्यशोधकच्या प्राथमिक चर्चेसाठी आम्ही जमणार आहोत. तिथं ये, म्हणजे पुढचं पाऊल काय उचलायचं याचा पक्का निर्णय घेता येईल.

(रोडे जातो. हळू हळू काळोख होतो, पुन्हा उजेड येतो तेव्हां नारभट आपल्या साथीदारांसह दाढ्या वाढलेल्या अवस्थेत दिसतात.)

नारभट : त्या त्या हरामखोराची बीन पाण्यानं भादरावी असं वाटतंय्.

१ भट : हो ! नाही तरी पाण्याचं दुर्भिक्ष आहेच.

नारभट : इतकी वर्षे चालत आलेली केशवपनाची पवित्र परंपरा या अडेल तट्टुच्या अडमुठेपणामुळे बंद पडायची वेळ आल्ये.

२ भट : नारभट, खरं सांगू ? खरं म्हणजे भरगच्च केश संभार असलेली विधवाच खरी सुरेख दिसते.

१ भट : हळू हळू होईल आपल्या डोळ्यांना सवय. काय ?

नारभट : क्यॅय काय क्यॅय ? नेहमी भांगेच्या नशेत असता, तेव्हा अस्वलीण सुद्धा रंभा मेनके सारखी दिसत असेल तुम्हाला. उद्यापासून ती भांग सोडा आणि वस्तरा घेऊन डोक्यावरच्या भांगाची बोडंती करायला शिका. आमचं कोणावाचून अडत नाही हे कळू दे त्यांना.

१ भट : आपण जर त्याचं शास्त्रोक्त शिक्षण देणार असाल तर त्याला आमची तयारी आहे. एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ.

२ भट : सहकाराने उद्योग करा असं जोतिबासुद्धा सांगतो.

नारभट : होना. मग घ्याच तुम्ही वस्तरा हातात. ब्राह्मणाचं कसब हे पुस्तक लिहून त्यानं तुम्हा भटांची धोतरं सोडलेलीच आहेत. आणि त्या गुलामगिरीत, ब्रह्मदेवापासून ब्रह्मगाठीपर्यन्त, समस्त ब्राह्मण संस्कृती नरकात बुडवल्ये त्यानं. आता काय तर म्हणे सत्यशोधक समाज नावाचं चांभार चौकशी मंडळ स्थापन केलंय. तुम्ही जा त्याच्या मागोमाग आणि करा दफन स्वतःच्या धर्मांचं.

१ भट : त्यापेक्षा हजामती केलेल्या बऱ्या. काय ?

२ भट : अरे पुरुषांना आपण कसेही भादरूं, पण विधवा स्त्रियांना जरा नाजूकपणानंच हाताळलं पाहिजे, काय ?

१ भट : त्यातून आमच्या सारखे मारुती भक्त; स्त्रिच्या जवळ गेले तर जिवंतपणी सता जायचे, राख व्हायचे.

नारभट : भेकड, नामर्द, षंढ.

१ भट : असला जिभेचा वस्तरा आम्हालाही चांगला चालवता येतो. पण खराखुरा वस्तरा चालवायचा म्हणजे... (वामनभट येतो)

वामनभट : त्याची आता गरज नाही, न्हाव्यानी संप मागे घेतलाय. इंग्लंडच्या मडमांनी आणि नामवंत संस्थांनी, त्यांना अभिनंदनाच्या तारा पाठवल्येत, त्यांचा जय झालाय.

नारभट : अरे हे हें अस होणार याची मला शंभर टक्के खात्री होती. शेवटी आम्ही ब्राह्मण लोक अशी तशी माघार घेणाऱ्यापैकी नाही.

वामनभट : नारभट, माघार आपल्यालाच घ्यावी लागल्ये.

नारभट : काय ? अरे यालाच म्हणतात यशस्वी माघार, पुन्हा संप करा मग दाखवतो तुम्हाला, असा अर्थ आहे या पिच्छेहाटीचा समजलं ?

तिघेही भट : समजलं, या संपात संपला कोण, ते समजलं.

नारभट : कसं का असेना, संप मिटला ना ? नाही तर उद्यापासून आमच्या सारख्या उच्चवर्णीय भूदेवांच्या हातात वस्तरा पडला असता, आणि नाभिकाचं क्षुद्रकर्म करावं लागलं असतं. (तिघेही भट गेलेले आहेत) हा न्हाव्यांचा विजय नसून मनुस्मृतीचा विजय आहे. चला आता खुटावर जाऊन ही दाढीची खुंट साफ करून चेहेऱ्याला जरा नितळाई आणली पाहिजे. गेला महिना सुरंगा तोंडाशी तोंड नेऊं देत नाहीये. आज रात्री सगळं उट्ट भरून काढलंच पाहिजे.

(हळू हळू अंधार होतो. अंधारात पुढील कविता ऐकू येते व सावित्रीबाई लिहीत आहेत त्यांच्यावर प्रकाश पडतो.)

"अडाणी जनांचा असे कर्णधार
तयाना असे देतसे सद्‌विचार
कृतिवीर होता तसा ज्ञानयोगी
स्त्रिया शुद्रांसाठी सदा दुःख भोगी"

( काशिबाई येते )

काशिबाई : काकू तुम्ही इतक्या कविता लिहिल्यात, आणि अजूनही लिहीताहात पण त्या अक्षरांच्या आळया बनलेल्या मी तरी कधी पाहिल्या नाहीत.

सावित्री : अग म्हणायचंय काय तुला ?

काशिबाई : स्त्रियांनी अक्षर लिहिली तर त्यांच्या आळया बनून त्या पुरुषांच्या ताटात येऊन वळवळतात असं मोठी माणसं आमच्या लहानपणी आम्हाला सांगायची.

सावित्री : असंच आहे बरं. मोठ्यांनी पुढच्या पिढीला शहाणं करायचं असतं पण इथं सगळाच उलटा प्रकार आहे. आता तू लिहाय वाचायला शिकलीस, म्हणून तुला याचा उलगडा झाला. अग या लिहिण्या वाचण्याच्या ओढीनंच यांच्या मागोमाग मला सासरचा उंबरठा ओलांडावा लागला. माहेरचं गणगोतही वर्ज्य करावं लागलं.

"सत्यासत्याशी मन केले ग्वाही मानियले नाही बहुजना" मी शिकत असताना आणि शिकवीत असताना मला काही कमी त्रास सहन करावा लागला नाही. त्यातल्या कांहीना सामोपचारानी आणि कांहीना हाताचा प्रसाद देऊन खाली मान घालायला लावलंय मी.

काशिबाई : तात्या नेहमी आऊ म्हणून जो उल्लेख करतात तो आपल्या सासु-बाईंचा का ?

सावित्री : (भारावून जाते) आमची दोघांची आई होती ती. जॉन नांवाचे गोरे साहेब होते, त्यांच्याकडे होती ती त्यांची मुलं सांभाळायला. त्याच मुलांत यानाही तिनं लहानाचे मोठे केले. शिक्षण घ्यायला तयार केलं, ती स्वतःसुद्धा इंग्रजी बोलायची, मला शिकवण्याची खटपट करीत असताना स्वतःही माझ्याबरोबर शिकली, आम्ही दोघी एकाच वेळी ट्रेन्ड मिस्ट्रेस-म्हणजे, शिक्षिका झालो.

काशिबाई : काकू माझीही खूप शिकायची इच्छा आहे. त्यासाठी कितीही कष्ट घ्यायची माझी तयारी आहे.

सावित्री : आलं लक्षात, तुला शिक्षणाचे डोहाळे लागलेत, आणि ते पुरवणं माझं कर्तव्यच आहे. आमचे गफार बेग मुन्शी काका नेहमी म्हणायचे "शिक्षणाची भूक वाढल्यामुळे एकाद्या देशात जर शिक्षणाचा दुष्काळ पडला तर तो देशच खरा समृद्ध समजावा."

( इतक्यात बाहेर जयजयकार ऐकू येतो.)

काशिबाई : काकू, काकू तात्यांच्या नावाचा जयजयकार करीत केवढी मोठी मिरवणूक आल्ये बघा, अगोबाई, बाई–बाई केवढी गर्दी ही !

सावित्री : अग आज त्यांना पुणे नगरपालिकेचं सदस्यत्व मिळालंय ना...

काशिबाई : तरीच, आपल्या मनातली गोष्ट घडून आल्याचा आनंद आहे प्रत्ये-काच्या चेहऱ्यावर. काकू, काकू मी त्यांना ओवाळते, चालेल ना ?

सावित्री : त्यांना असलं कांही आवडत नाही. पण तुझ्या मनांत आलंय तर माझ्या परवानगीसाठी थांबू नकोस. जा जा लवकर (ती जाते)

जयाचे मुळे मी कविता करते
जयाचे कृपे ब्रह्म-आनंद चित्ते
जयाचे बुद्धी मिळे सावित्रीस
प्रणामा करीते स्वामी-जोतिबास"

( इतक्यात जोतिबा येतात, गळयात हार कपाळाला गुलाल)

जोतिबा : सावित्री, तुझ्या डोळयात पाणी ?

सावित्री : ज्योतीकडे एकटक दृष्टी लावून बसल्यावर तसंच होणार.

जोतिबा : पण या दोन निरांजनांच्या ज्योतीच्या प्रकाशातच इथवर वाटचाल केल्ये ह्या जोतिबानं. या पुढचा मार्ग स्वच्छ दिसावा यासाठी त्यानी जास्त प्रज्वलीत व्हायला हवं. (काशिबाई तबक घेऊन येते) हे काय? एवढा कसला पराक्रम केलाय मी ?

काशिबाई : तात्या, सूर्य रोज उगवतो आणि मावळतो, त्यात त्यालासुद्धा कसलाच पराक्रम केल्यासारखं वाटत नाही पण...

जोतिबा . वा ! तू सुद्धा काव्यात बोलायला लागलीस ? प्रगति आहे.

सावित्री : हे ती बोलत नाहीये, तिचा आतला आवाज बोलतोय. ( काशीबाई लाजून आत जाते)

जोतिबा : असं असं. सावित्री, या पोरीचे आई-बाप खरोखरीच कमनशिबी. अशा निरागस मुलीकडे पाहिलं म्हणजे या कर्मठांची मनस्वी चीड येते.

सावित्री : हे बघा, डोकं शांत ठेवा. शहराची अंतर्बाह्य स्वच्छता करणाऱ्या नगरपालिकेचं सदस्यत्व आलंय आपल्याकडं, आता नव्या जोमानं कामाला लागलं पाहिजे आपल्याला. स्वच्छता करण्यासाठी शूद्रांचा

जन्म झाला असेल तर ती कशी करावी हे सप्रमाण दाखवून दिलं पाहिजे आपण.

( दोघांवर प्रकाश पडतो आणि )

" निर्मिके निर्मिले मानव पवित्र । कमजास्त सूत्र, बुद्धीमध्ये ।
पिढीजात बुद्धी, नाही सर्वांमधी, शोध करा आधी पुर्तेपणी ।
सत्य सेवूनीया, चित्त करी स्वच्छ, मग मान तुच्छ, मानवास ।
मनाची स्वच्छता नाही समजला, भूमीभार झाला जोती म्हणे ।

(अखंडाचे स्वर चालू असतानाच पडदा पडतो.)

– अंक दुसरा समाप्त. –

## अंक तिसरा — प्रवेश पहिला

(नगरपालिकेच्या बैठकीत जोतिबा भाषण करीत असतानाचे दृष्य.)

जोतिबा : " दारूचे व्यसन हे नागरिकांच्या नैतिक आचरणाला बाधक आहे. आणि आरोग्याला अपायकारक आहेच आहे. शहरातून जागोजागी दारूचे गुत्ते उघडल्यापासून, दारूबाजीचे प्रमाण भरमसाट वाढलंय. त्याचे दुष्परिणाम आपण पहातोच आहोत. या गोष्टीला आळा बसावा म्हणून नगरपालिकेला मी अशी सूचना करतो कीं, नगरपालिकेनं यापुढे दारूचे गुत्ते उघडण्यास कोणासही परवानगी देऊ नये. त्याचबरोबर सध्याच्या दारूविक्रीवर जबरदस्त कर बसवावा. "

त्यांचे भाषण संपल्यावर टाळयांचा कडकडाट होत असताना अंधार होऊन दृष्य बदलते व नारभट आणि त्याचे साथीदार दिसू लागतात.)

वामनभट : सावकार, या पुढं आपण आपले उद्योग निमुटपणे करावेत असं मला वाटायला लागलंय.

नारभट : ते तरी सुखानं करू देणार आहे का तो चांडाळ ? आमची सगळी कंत्राटं काढून घेऊन, ती इतर जातीच्या कंत्राटदारांना द्यायला लावल्येन त्या हरामखोरानं.

१ भट : नारभट, आपण सगळे उपाय केले. मध्यंतरी मंडईला रे साहेबांचं नांव द्यायला त्यानं विरोध केला, तेव्हा आम्ही आमच्या देखरेखीखाली मैल्याच्या पाच गाडया त्याच्या दाराशी उपडया करून घेतल्या पण परिणाम काय झाला ?

२ भट : त्या दयानंद गोसावड्याच्या मिरवणूकीला आपण ब्राह्मण मंडळींनी इतका विरोध केला पण निष्पन्न काय झालं ?

वामनभट : नारभट, मला हे कळत नाहीये, गणूकाका जोशी ..

१ भट : म्हणजे सार्वजनिक काकाच ना ?

वामनभट : हो रे बाबा तोच. सार्वजनिक काका, महादेवराव कुंटे, खंडू रास्ते, दाजी नगरकर, कृष्णाजीपंत रानडे इतकी सगळी ब्राह्मण मंडळी मुनसीपालटीत असतांना त्यांची कांहीच कशी मात्रा लागू पडत नाही ?

नारभट : हे जर तुला कळलं असतं तर मी तुला मुलतानी माती मल्ल कशाला केला असता ? आपली भटांची जातच दळभद्री. तो ह्या चिपळूणकर बघ, त्या ख्रिस्ताळू खाचेत कसा शेणकिड्यासारखा वळवळतोय. कुठे बाप आणि कुठे हा कुलांगार ! मुनसीपालटीत सुद्धा सगळी भटं आपली डोकी गहाण ठेवून बसल्येत की काय ? अरे त्या व्हाइसराय लॉर्ड लिटनच्या सत्काराप्रित्यर्थ मंडप आणि रोषणाईचं कंत्राट मला मिळावं म्हणून मी नेटाचा प्रयत्न केला होता, तोसुद्धा या भागुबाई भटांच्या पुढ्यात धुडकावून लावलान त्या चांडाळानं. म्हणे "नगर-पालिकेला ही पैशाची उधळपट्टी परवडणार नाही. तोच पैसा मागास-वर्गीयांच्या कारणी लावा". ते काय आमच्या हातावर हगणार आहेत ?

१ भट : सावकार, तुम्ही गर्भश्रीमंत. जोतिबाचं पण यथास्थित चाललंय. सध्या मोठ मोठी कंत्राटं घेतोच आहे. सोनारांना लागणाऱ्या मुशींचा त्याचा कारखानाही जोसात चाललाय. कांही दिवसांनी पेढ्या सुद्धा काढील सोन्या चांदीच्या. मधल्यामधे आमचे मात्र हाल आहेत. भिक्षुकी करून उदरभरण करू म्हटलं, तर संध्येच्या चोविस नावांच्या पलिकडे आम्ही कधी गेलोच नाही.

२ भट : पेशवाईतल्या भटांना निदान दोन वेळचा पुख्खा तरी झोडता येत असे. शिवाय ओगराळं भरून दक्षिणा मिळायची ती वेगळी. त्या वेळचे ब्राह्मण खरोखर सुखी रे बाबा.

वामनभट : ब्राह्मणांनी इतर धंद्यात लक्ष घातल्याशिवाय त्यांची खरी प्रगति होणार नाही हे नारभटांच्या लक्षात आलं, म्हणूनच त्यांनी दारूच्या दुकानाचा परवाना काढायचं ठरवलं होतं पण...

नारभट : त्याही आमच्या महंमदी स्वप्नाचा चक्काचूर करून टाकलान त्या हरामखोरानं. म्हणे, 'दारूचं व्यसन हे नागरिकांच्या नैतिक आचरणाला बाधक आहे.' हं ! ज्यानं कधी दारू चाखलीच नाही त्यानं या असल्या वल्गना कराव्या ? मूर्ख, शतमूर्ख.

१ भट : एका अर्थी ने बरंच झालं, नाहीतर आम्हाला नको त्या माणसाचे उष्टे पेले विसळावे लागले असते.

२ भट : शिक्षण नसलं की पडेल ते काम पडेल त्या भावात करावं लागतं बाबा, जगरहाटीच आहे ती.

वामनभट : अरे हो बरी आठवण झाली. नारभट, जोतिबा फुले आज हंटर कमिशनला कसलंसं निवेदन सादर करणार आहे म्हणे. काय प्रकार असावा हा ?

नारभट : भुताटकीचा. त्याचं भूत तुमच्या मानगुटीवर बसलंय ना. त्याचा. तुला हजार वेळा सांगितलं माझ्यासमोर त्याचं नांव घेत जाऊ नकोस म्हणून. हंटर कमिशन म्हणे ! आधी त्याला आणि त्याच्या बायकोला भर चौकात उभं करून हंटरनं फोडून काढलं पाहिजे. माकडांच्या हातात विद्येची मशाल देऊन सगळ्या जगाला आग लावायला निघालाय तो. अरे पण आम्ही सुद्धा काही कमी नाही. शेवटी आमच्याच पायावर डोकी आपटून मरावं लागेल म्हणावं तुम्हाला. साहेब लोक सुद्धा आम्हाला पुरते ओळखून आहेत. तुला त्या हंटरच्यापुढे जे काही अकलेचे तारे तोडायचे असतील ते तोड म्हणावं. मग आम्ही आहोत आणि साहेब लोक आहेत.

(हळू हळू अंधार होतो. दृष्य बदलते. जोतिबा निवेदन करतात)

जोतिबा : 'मी एक कॉन्ट्रॅक्टर, शेतकरी आणि नगरपिता या नात्यानं असे निवेदन करतो की, हंटर कमिशनची फिल्टर–डाऊन, म्हणजेच झिरपत जाणारी शिक्षणपद्धती सदोष आहे. आणि तिला माझा कडाडून विरोध आहे. वरिष्ठ वर्गातले लोक कनिष्ठ वर्गातल्या लोकांना शिक्षण देतील हे सरकारचं सुखस्वप्नं आहे. कारण शेतकरी सरकारला जो सारा देतात त्या उत्पन्नातला बराचसा भाग सरकार वरिष्ठ लोकांच्या शिक्षणावर उधळीत आहे. श्रीमंतांच्या मुलांना शिक्षण देऊन, त्यांना उच्चाधिकारावर बसवण्यासाठीच सर्व विद्या-

लयांची स्थापना झालेली आहे. पण त्याच विद्यालयातून बाहेर पडलेल्या सुशिक्षितांनी कनिष्ठ वर्गाच्या उन्नतीसाठी काहीही भर घातलेली नाही.

(टाळयांचा गजर होतो. दृष्य पूर्वीचे. नारभट आणि भटजी)

नारभट : कनिष्ठ वर्गाच्या उन्नतिसाठी तू एकटा जीव घालवतोयस तेवढंच पुरे झालं. ज्या दिवशी तू स्वतःच तयार केलेल्या ह्या वणव्यातून कुळाचा जाळून खाक करील तेव्हा तुझे डोळे उघडतील.

वामनभट : नारभट, अहो नारभट, जाउंदे, अहो शिक्षण खात्याचा आणि आपला काडीचाही संबंध नाही. आपल्याला अजून बरीच कामं आहेत. ती दोघं पोरं उद्या सुटणार आहेत तेव्हा आपल्याला मुंबईला जायला हवं.

नारभट : मरूं देत, मला कशातच रस वाटेनासा झालाय.

१ भट : एखादा सोमरसाचा घोट घेतल्यावर...

नारभट : गप्प बैस. प्रत्येक गोष्टीत हा चांडाळ जर अशी नाकेबंदी करायला लागला तर त्याच्यावर काहीतरी जालीम उपाय योजला पाहिजे.

वामनभट : म्हणूनच म्हणतोय त्या दोन नव्या दमाच्या पोरांना हाताशी धरु या.

नारभट : कोणाची पोरं ?

वामनभट : अहो असं काय करता ? आपल्या गंगाधरपंत टिळकांचा बाळ आणि गणूकाका आगरकरांचा गोपाळ. हुशार आहेत पोरं. त्यांना उद्या डोंगरीच्या बंदीशाळेतून सोडून देणार आहेत. निर्दोष.

( हळू हळू काळोख होतो. सनई, चौघडा, लेजीम आणि टिळक, आगरकरांचा जयजयकार वगैरे ऐकू येतो व मिरवणुकीचे दृष्य दिसते. जोतिबा, रोडे, पंडीत व इतर लोक दिसतात. सार्जंट येतो व मिरवणूक अडवतो. )

सार्जंट : स्टॉप धीस, आय से स्टॉप धीस, बंद करा.

जोतिबा : कॅन आय आस्क यू व्हाय ?

सार्जंट : मी शांगतो म्हनून.

जोतिबा : मिरवणूक कोणत्याही परिस्थितीत गिरणगावापर्यंन्त जाणार आहे आणि तसा आमच्याजवळ परवाना आहे.

सार्जंट : सो व्हाट ? ते दोगे कयदी आहे-त तेवा ट्माला टयांची प्रोसेशन काडता येनार नाय.

जोतिबा : फ़ॉर युवर इन्फमेंशन. ते कैदी होते. आता स्वतंत्र नागरिक आहेत.

सार्जंट : माजा हुकूम टुमी पाळला नाय तर तो राजदरोह होईल.

जोतिबा : आपल्या राणीसाहेबांनी, त्यांना स्वतःला त्यांची चूक कळून चुकल्यावरच टिळक आगरकरांची सुटका केलेली आहे. आणि त्याबद्दल त्यांनी आनंदही व्यक्त केला आहे. तोच आम्ही जनतेला दाखवतो आहोत.

सार्जंट : मिरवणुकीला परवानगी असली तरी ती शांतपनाने गेली पायजे. स्लोगन्स देऊ नको.

जोतिबा : ऑल राईट. राणी सरकारचा विजय असो, राणी सरकारचा विजय असो.

सार्जंट : व्हेरी गुड. अशी स्लोगन च्यालेल... (हसतो)

जोतिबा : त्यात तुम्हांला आनंद झाला ना ?

सार्जंट : ऑफ कोर्स. मला फार आनंद जाला.

जोतिबा : असाच आनंद आम्हालाही झाला आहे. आणि तोच आम्ही व्यक्त करतो आहोत. त्यात कुठल्याही प्रकारचा राजद्रोह नाही.

सार्जंट : ओ. के. ओ.के. प्रोसिड, चला पुढे चला पण आवाज जरा कमी करा. ( दोघे एकमेकांकडे बघून हसतात. मिरवणूक निघून जाते. दुसऱ्या दिशेने नारभट आणि त्याचे साथीदार हातात हार घेऊन येतात.)

नारभट : आपल्या नाकावर टिच्चून त्या बाळ-गोपाळांची मिरवणूक, मिरवत मिरवत घेऊन गेला तो. छे ! या हरामखोराला नामोहरम करण्यासाठी काय हिकमत लढवावी तेच कळत नाहीये.

वामनभट : सावकार, सध्या त्याचं पारडं जड आहे. हे अगदी खरं. पण कालांतरान रावण आणि कौरव जसे जमीनदोस्त झाले तसा हा सुद्धा...

नारभट : पण मला ते याची देही आणि याची डोळा बघायचंय. त्यासाठी मी स्वतः जमीनदोस्त झालो तरी हरकत नाही. ( सार्जंट येतो ) या या साहेब. नमस्कार.

सार्जंट : टुमाला उशीर जाला. मिरवणूक गेली दूर.

नारभट : आम्ही मिरवणुकीत मिरवायला आलो नाही.
(त्याच्या गळ्यात ते आणलेला हार घालतात )
आपला सत्कार करण्यासाठी आलो आहोत.

सार्जंट : कशाबद्दल ?

नारभट : आपल्या राणीच्या राज्यात, कोणीतरी लुंग्या-सुंग्या, पोरासोरांना घोड्याच्या गाडीत बसवून, आपल्याला वाकुल्या दाखवित त्यांना

मिरवत घेऊन जातो आणि आपण त्यांना सुखेनैव धांगडधिंगा घालू देता ?

सार्जंट : टुमची चुकी हाय. हुर हायनेसनी त्या दोगांना निर्दोस सोडून दिल्याबद्दल त्यांनी त्या दोघांची मिरवणूक...

नारभट : पण तो अधिकार आम्हा ब्राह्मणांचा आहे. माळघा–कोळघांचा आणि महारामांगांचा नाही.

सार्जंट : (उपरोधिक) अगदी बरोबर, म्हणूनच त्यांनी टुमा लोकांना सामील करून घेतले नाय. सावकार या जाती आमी माणसांनी बनवल्या. प्रभूने माणसाला केवळ माणूस म्हणूनच जन्माला घातले. टुमा लोकांना हे समजले नाय, म्हणूनच आमी लोक इतक्या दूर येऊन शनिवार वाड्यावर आमचा युनियन जॅक झेंडा लावला. आता या पुढे तरी सुदारना करता आली तर प्रयत्न करा. (गळ्यातले हार काढून त्याच्या हातात देतो आणि ताड ताड निघून जातो.)

नारभट : प्रयत्न ? तेच केले, करतोय आणि शेवटपर्यंत करीत रहाणार मी. (हाराकडे बघतो. कुस्करतो) त्याचा शेवट केल्याशिवाय रहाणार नाही मी.

(हळू हळू काळोख होतो. दृष्य बदलते)

## अंक तिसरा -- प्रवेश दुसरा

(जोतिबा फेऱ्या मारत मजकूर सांगत आहेत. सावित्रीबाई तो लिहून घेत आहेत. )

जोतिबा : "बुधवार ता. १८ माहे जुलई सन ईसवी १८८३, जुना गंज पेठ, पुणे. फॉर द काइंड कन्सीडरेशन ऑफ हीज एक्सलन्सी, व्हॉयसराय अॅन्ड गव्हर्नर जनरल ऑफ इंडिया, मी सत्यशोधक समाजाचा एक सभासद, जोतिराव गोविंदराव फुले, शूद्र शेतकऱ्यांच्या बचावाकरीता "शेतकऱ्याचा आसूड" कंसात कल्टीवेटर्स व्हीप कॉर्ड हे निवेदन आपणाकडे पाठवित आहे. त्याचा आपण कळकळीने विचार कराल अशी खात्री बाळगून माझ्या पुढील निवेदनास सुरुवात करीत आहे."

"विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली,
नीतीविना गति गेली, गतिविना वित्त गेले,
वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ अविद्येने केले."

( पार्श्वसंगीतात प्रथम लढाईचे ध्वनी, नंतर पुजेचे मंत्र, श्लोक, श्राद्धाचे मंत्र, मंगलाष्टके, आसूडाचे फटकारे, गाई, म्हैशींचे हंबरणे व शेवटी पार्वतीपते हरहर महादेव व नंतर आशिर्वादाचा मंत्र ऐकू येतो व नंतर शांतता होते. नंतर कोर्टाच्या ललकाऱ्या ऐकू येतात. बायका व लहान मुलांचे रडणे ऐकू येते. चर्चच्या घंटा वाजतात. आणि गंभीर स्वर ऐकू येत असतांना जोतिबा बोलू लागतात.)

"तूर्त माझे काहीच म्हणणे नाही. परंतु सरकारानी शेतकऱ्यांच्या मुलास विद्या देण्याची थाप देऊन वसूल केलेला एकंदर सर्व लोकल फंड, तेवढातरी निदान शेतकऱ्यांच्या मुलांस इमाने-इतबारे विद्या देण्याचे कामी खर्ची घालु लागल्यास, मी इतके दिवस श्रम केल्याचे फळ मिळाले असे समजून मोठा आनंद मानिन."

(घड्याळात पांचचे ठोके पडतात. काशी दुधाचा पेला घेऊन येते.)

सावित्री : रात्र कधी उलटली हे कळलंच नाही.

काशी : तात्यांचे शब्द कागदावर उतरवायचं काम तुमच्याशिवाय दुसऱ्या कोणाला थोडंच जमणार आहे ? एकदा साधं पत्र लिहून घेतलं त्यांनी माझ्याकडून पण माझी जी काय त्रेधातिरपीट उडाल्ये ती माझी मलाच ठाऊक.

जोतिबा : काशी, विचारांच्या गतीनं येणारे शब्द; त्याच गतीनं कागदावर उतरवण्याची कला, फारच थोड्या लोकांना अवगत असते. सावित्रीला ते कसब अगदी अचूक साधलंय. लिहीताना; नेहमी चार शब्द ती माझ्या पुढेच असते. एखाद्या प्रश्न चिन्हाला उत्तर देण्यासाठी; मी किंचित विचार करायला लागलो तर तिनं तो प्रश्न सोडवायला सुरूवात सुद्धा केलेली असते.

सावित्री : पुरे, हं. (कागदांची आवराआवर करतात.)

जोतिबा : सावित्री, माझ्या मागे माझं कार्य तू पुरं करशील याची मला मनोमन खात्री आहे......

सावित्री : सकाळच्या प्रहरी हे कसलं अभद्र बोलणं ?

जोतिबा : अभद्र ? अटळ गोष्टीला अभद्र म्हणणारी संस्कृती, संस्कृत ग्रंथातून शेवटचे दिवस मोजतेय. सावित्री सत्याचा शोध घेणाऱ्यानं, कटू सत्याचा घोटसुद्धा उमेदीनं गिळायला हवा.

(सावित्री खाली मान घालून आत जाते)

काशी : तात्या. आम्ही बायका अगदी जगाचं राज्य करण्याइतक्या शिकलो सवरलो तरी.....

जोतिबा : मनानं हळव्या असतो. असंच ना ? पोरी, स्त्री ही, हळवी, प्रेमळ आणि मर्यादशील असलीच पाहिजे. पण तिच्या अंगच्या या गुणांना दुर्गुण मानित आलेत पुरुष. यशवंताची जन्मदात्री या नात्यानं तुला

सांगतो, प्रत्येक स्त्रीनं आपल्या पोटी येणाऱ्या मुलाची जडण-घडण अशी घडवावी की...

काशी : तात्या तुम्ही दोघानी मला पुनर्जन्म दिलात हे त्याला गर्भावस्थेतच समजलं, म्हणून बोलता यायला लागल्यापासून, काकूना आई आणि तुम्हाला बाबा म्हणून हांका मारतोय तो, मी केवळ त्याला जन्म दिलाय, त्याच्या वृद्धीला आकार देण्याची कुवत माझ्यात कुठून असणार? आपल्या दोघांच्या कृपेनं आत्ता आत्ता मला लिहिता वाचता यायला लागलंय.

जोतिबा : अग, जिजाबाईला तेही येत नव्हतं, पण शिवाजीसारखा राजा घडवलाच ना तिनं ?

काशी : तात्या, माझ्यातल्या पिढीजात ब्राह्मण्याचे कुठलेही संस्कार त्याच्यावर होऊ नयेत याचीच काळजी मी घेत आल्ये. आता तो; यशवंत जोतिराव फुले या नावानं ओळखला जातोय. आपल्या दोघांच्या छत्राखाली तो मोठा झाला की जन्माचं सार्थक झालं त्याच्या.

जोतिबा : काशी, त्याला डॉक्टर करायचं आमच्या मनांत आहे. बरी आठवण झाली, उद्या यशवंतासाठी स्थळं शोधायची वेळ आली तर...

काशी : ब्राह्मणाची मुलगी सोडून, फुले घराण्याला शोभेल अशी कुठल्याही जातितली सुशिक्षीत मुलगी सून म्हणूच या घरात आणा. किंवा लग्नानंतर तिला सुशिक्षीत करा.

जोतिबा : शाब्बास काशी, शाब्बास. (सावित्रीबाई येतात)

सावित्री : शाब्बास ! अग यशवंता तुझी तिकडे वाट बघतोय, आणि तू इकडे शाबासक्या कसल्या घेत्येस ? तो व्यायाम शाळेतून येऊन आंघोळीला गेलाय. जा आधी त्याला गरम गरम शिरा करून दे. (काशी जाते) चला. तुम्ही आंघोळ करून घ्या. पाणी काढून ठेवलंय, रोडे येईल आता, आज सत्यशोधक समाजाची झेंडा मिरवणूक आहे ना ? काल संध्याकाळीच सांगून गेलाय तो सकाळी सहाला हजर होईन म्हणून.

जोतिबा : सावित्री, रोडे आणि धोंडीराम वीस वर्षापूर्वी कसे होते आणि आता कसे आहेत हे पाहिलं की असं वाटत...

सावित्री : परिसाच्या स्पर्शानं लोखडाचं सोनं होतं...

जोतिबा : तुझ्यासारख्या कवयत्रीच्या कल्पनेप्रमाणें, जोतिबा हा जरी परिस असला, तरी सोनं करून घेण्याचा गुण त्या लोखंडात होता; हे तरी तुला पटलं की नाही ?

सावित्री : आतापर्यंत पटवून दिलंत, आणि पटवून घेतलंत म्हणूनच आपलं पटलं. हे तरी पटतंयना आपल्याला ?

जोतिबा : पटवून घेणंच भाग आहे. (तिच्या जवळ जातात) आमचं काव्य; कसं दणकट प्रकृतीचे.

सावित्री : टक्कर देणाऱ्या कवीच्या प्रतिभेला नाजूक असून कसं चालेल ?

जोतिबा : राईट यु आर, माझ्या बोलण्यातला आशय लक्षात आला तर तुझ्या ?

सावित्री : हं ! स्वतःचं सोनं करून घेण्याचा गुण कांही लोखंडात असतो अस कोणीतरी आत्ताच म्हणालं

जोतिबा : चला जोतिबा, आतामात्र आंघोळीला गेलंच पाहिजे. (ग्रामीण भाषेत बोलतात) "काव्याच्या पंचगक्वयाचं परोकक्षन करन्या परीस, परीस बरका, परीस, साद्या पान्यानं अंघुळ क्येलेली बरी काय ? कारभारनी ?

सावित्री : हे काय ? आज अगदी ग्रामीण भाषा ?

जोतिबा : हे इन्व्हीटेशन वाच म्हणजे उलगडा होईल तुला.

(तिच्या हातातला पंचा घेऊन जातात. सावित्रीबाई टेबलावरचा लिफाफा उघडून वाचू लागतात. पार्श्वसंगीतात आनंदोत्सवाचे सूर ऐकू येतात आणि हळू हळू दृष्य बदलते. मागील भागात पार्टीचे दृष्य दिसू लागते, मोठी मोठी मंडळी बसलेली दिसतात, दिव्यांची रोषणाई कांही लोकांच्या हातात मद्याचे पेले. कांहीजण समूहासमूहाने गप्पा मारीत आहेत. इतक्यात लहान मुलांच्या आवाजात घोषणा ऐकू येतात. "टेल युवर ग्रँड मदर दॅट, वुई आर अ हॅपी नेशन, विदाऊट एज्युकेशन" "राजपुत्रा, तुझ्या आजीला सांग की आम्ही सुखी आहोत, शेतकऱ्यांच्या मुलांना विद्येची भीक घाला" "निरक्षराना साक्षर करा" या गोंगाटातून नारभट सावकार येतो.

नारभट : काय काटर्यांनी उच्छाद् मांडलाय् (दारावरच्या चपराशाला) अरे, तू काय इथ पुतळ्यासारखा उभा राहिलायस ! आधी त्या काट्यांना हाकलून लाव बघू. ।

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २०६५८ नों. दि २९/१२/५८
वि. नाटक क्र.

चपराशी : मला माझी जागा सोडता येनार न्हाय. आतून तसा हुकूम झाल्येला हाये, ज्याच्याकडं पास आसल त्याला आत सोडायचं इतकचं माझं काम हाये, तुमास्नी आत जायाचं आसल तर तुमचा पास दाखवा आनि आत जावा.

नारभट : हं, हा बघ. (कार्ड दाखवतो) तू पण एक नमुनाच आहेस.

चपराशी : आत मधी जावा, येक्यापेक्षा एक नमूने बघाया घावतील. (नारभट जातो आणि जोतिबा शेतकऱ्याच्या वेषांत दारावर येतात) ए लंगोट्या कुटं निघाला ?

जोतिबा : आतमधी खान्या-पिन्याची पंगात हाय नव्हं ?

चपराशी : ती म्होट्या लोकांसाठनं हाय, तुझ्यासारक्याचं काय काम हाय तिथं ?

जोतिबा : अवो मलाबी आवतान दिलंय, चिपलूनकर तात्यांनी.

चपराशी : ते उष्टीखरकाटी काडन्यासाटनं असल. त्याला अजून लयी वखत हाय. जा तिकडं येक्या कडला उबा न्हा.

जोतिबा : (आवाज चढवतात) अरं माज्याकडं आवतानाचा कागुद हाय म्हनतो तरी. ह्यो बग. (कार्ड दाखवतात) चपराशी :दुर्लक्ष करून त्यांचे बखोट धरून त्यांना खेचून बाजूला नेतो) अंगाला हात लावू नको. नायतर हड्डी नरम करीन तुजी. (दोघांची बाचाबाची चालू असताना चिपळूणकर येतात.)

चिपळूणकर : अरे, अरे, काय हे. सोड त्यांना. मूर्खा त्यांना ओळखलं नाहीस ? जोतिराव, आज या असल्या पोषाखात ? क्षणभर मी सुद्धा ओळखलं नाही तुम्हाला, चला.

जोतिबा : म्हटलं ड्यूक ऑफ कनॉटचा सत्कार आहे. तेव्हा खऱ्या भारतीयाच्या वेषातच त्याच्या समोर जावं.

चपराशी : (पाय धरतो) माफ करा, तात्यासायेब, मी आपल्याला वळखलं न्हाई, आनि काय-बाय बोललो.

जोतिबा : तूच काय पण इथल्या शेतकऱ्यांना आणि शूद्रांनासुद्धा आपण कोण होतो आणि कोण आहोत हे अजून कळलेलं नाही. तू जरी मला ओळखलं नसलंस तरी मी तुला ओळखलंय, हैबती पाटलाचा भाऊच ना तू ? दौलती. (तो मान हलवतो) चला पंत, ( दोघेही आत जातात. आतले संवाद संगीतामुळे ऐकू येत नाहीत. पण राजपुत्रा-

समोर चिपळूणकर व जोतिबा उभे दिसतात. नमस्कार वगैरे होतात आणि नारभट तरातरा बाहेर येऊन निघून जातो. त्यानंतर वातावरण शांत होऊन जोतिबांचे इंग्रजी भाषण ऐकू येते.)

"I appeal to your Royal Highness, the Duke of Connaught so convey to Your Royal Highness, Grand Mother, Queen Victoria, that the poor masses are in utter poverty and they badly want Education.

Your Royal Highness may be misled by the appearance of the rich clothes and diamonds glittering in the hall, but the fact is, these decorated worthies with scented clothes are not the reflection of India. They are not the representatives of the .peasants who compose the major portion of the population from the Villages.

The real India is seen in villages where people are penniless and foodless, shelterless and shoeless. The majority do not even get rags to hide their shame.

So if Your Royal Highness really wants to see and represent to Her Highness, Your Highness should go to some villages nearby and see the utter poverty the ignorant masses, and also visit some Mahar-Mang localities and see whether these localities are not worse than dunghills and unfit for human habitation. That is the real India !"

(दृश्य बदलते. नारभट सावकार आणि दोन भट दिसतात. दोघांचे पोशाख साधे आहेत.)

१ भट : सावकार, एक बित्तंबातमी आहे.

२ भट : अहो, बडोदे संस्थानात जोतिबांचे भलतेच प्रस्थ आहे म्हणे. महाराज त्याला बुकर टी वॉशिंग्टन म्हणतात. महात्मा म्हणतात.

१ भट : महात्मा म्हणतात. म्हणून देत, गपरे–एकदम काय सांगतोस.

२ भट अरे, आता आपली दुर्दशा इतकी झाली तर सांगू नको, तर काय करु ?

नारभट : जोतिबाला बडोद्यात मोठा भाव आहे असे म्हणतोस ते कशावरून ?

१ भट : हे पहा तिथल्या भिक्षुकांचे पत्र, वाचा.

नारभट : तूच वाच. हा पुण्याचा सुधारक तेथे काय दिवे लावतो ते ऐकून दे.

१ भट : अहो, महाराजांकडे तीन महिने मुक्काम होता जोतिबाचा.

नारभट : महाराज कोण ?

२ भट : हो, हो, सयाजीराव महाराज, गायकवाड सरकार यांचेकडे.

१ भट : मी सांगतो, आता इंदूर, ग्वाल्हेर येथे पण हा सुधारक

नारभट : ब्रिटीश सरकारकडे त्याची डाळ शिजणार नाही.

१ भट : आपली डाळ तरी येथे मुबईत कोठे शिजते.

नारभट : हे पहा पुण्याला तो फाटके कपडे घालून मारे इंग्रजीत भाषण करून बोलला.

१ भट : धडधडीत ब्रिटीशांच्या शाही मेजवानीचा अपमान.

२ भट : आपण ही वित्तंवातमी मुंबईत इंग्रज सरकारच्या गोटात सांगतोच आहोत.

१ भट : तो पहा—नारभट--तो येत आहे.

नारभट : (वाकून पहातात) कोण येत आहे ? हां, तो सार्जंट.

१ भट : अहो तो एकटाच नाही. बरेच सोजीर आहेत.
(मिरवणूकीचा आवाज, जोतिराव फुले यांचा जयजयकार असो, महात्मा जोतिराव फुले यांचा :जयजयकार असो.) घोषणा ऐका. मोठी सभा दिसते. अहो नारभट. (जरा पुढे जाऊन) इकडे या. मोठी सभा दिसते.

२ भट : मोठी सभा, मोठी सभा कशावरन म्हणतोस रे ? अरे तो गोरा सार्जंट तेथेच दिसतोय.

१ भट . हो, आहे. हारतुरे करा त्याला.

नारभट : हो, अडलय माझं. मेल्यानी माझा हार फेकलान. आठवण आहे मला काय करु रे !

१ भट : नारभट, अहो इकडे या.

नारभट : (पुढे जावून) अरे जोतिबाला हार...

१ भट : अरे हारतुरे झाले, पुढे ये, भाषणें ऐक.

२ भट : मला इंग्रजी कुठे येतय ?

१ भट : अरे इंग्रजीत नाही, मराठीत आहे.

(नारभट व दोन्ही भट जरा उंचावर जावून उभे राहतात. लांबवर पहात असतांनाच मानपत्र ऐकू येते.)

"बहुजन समाजाला अज्ञानातून वर काढून त्याला अर्वाचिन काळी जागविणारा भारतातील पहिला थोर पुरुष म्हणून जोतिराव गोविंदराव फुले यांना ही सभा मानपत्र देत आहे.

पहिल्या स्त्री शिक्षिका म्हणून सावित्रीबाई यांना शिक्षणक्षेत्रांत प्रथमच प्रयत्नपूर्वक बहुजन समाजातील मुलींच्या शाळा चालविण्यास प्रेरणा दिली. स्वतः रात्रीच्या शाळा सुरु केल्या. विधवांची अपत्ती-तून सुटका केली व बालहत्त्या प्रतिबंधक कार्याला वाहून घेतले- हे कार्य उभयतांनी केले.

पाण्याचा स्वतःचा हौद खुला करून अस्पृश्यांना पुण्यामध्ये पाणी मिळवून दिले. पुणे नगरपालिकेत दारु दुकानांवर जबरदस्त कर बसविण्याचा ठराव आणला, हंटर कमिशनपुढे शिक्षण विषयक साक्ष दिली आणि शेतकऱ्यांचें प्रतिनिधी म्हणून राणी सरकारकडे कैफियत जातीने दिली. याशिवाय नाटके, वृत्तपत्रे आणि गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड, इषारा ही ग्रंथ संपदा प्रकाशित करून साहित्य सेवा केली.

या सर्व कार्याचा विचार करता ही एक अमोल अशी जागतिक सेवा झाली आहे.

म्हणून ही सभा आम जनतेच्या वतीने जोतिराव गोविंदराव फुले यांना " महात्मा " ही पदवी अर्पण करीत आहे. या पदवीचा उच्चार बडोद्याचे कार्यप्रवीण राजे सयाजीराव गायकवाड यांनी यापूर्वी अनेक वेळा केला आहे.

सयाजीराव गायकवाड यांचा या सभेला आलेला निरोप आणि प्रेमाची भेट महात्मा जोतिराव फुले यांना अर्पण करण्यांत येत आहे. दिनांक ११ मे १८८८ स्थळ- मांडवी कोळीवाडा.

महात्मा जोतिराव फुले यांचा त्रिवार जयजयकार असो !

(हळू हळू आवाज कमी होतो. स्पॉट लाईट नारभटावर पडतो. इतक्यात सार्जंट येतो)

सार्जंट : आमी जोतीराव फुलेचा जयजयकार करते. त्यांना ही फुले भेट म्हणून देते. आमचे संगाती येल काय ?

नारभट : वारे इंग्रज, वारे टोपीवाले-

सार्जंट : काय झाले, आमी त्येला फुल दिले तर काय झाले ?

नारभट : राणी सरकारला कडक शब्दांत बजावणाऱ्या त्या पाखंड्याला तुम्ही लोक डोक्यावर घेते-

सार्जंट : आमच्या प्रभूला ते मानते. प्रभूचे काम ते करते. गोरगरीबांना पाणी देते. तुमी बामण बिघडले तवाच आमी शनिवार वाड्यावर निशान लावले. युनियन जॅक लावले. जोतीराव प्रभूचें काम करते आमी त्येला फुल देणार. तुम्ही शहाणे व्हा हे फुल द्यावा. (नारभट त्याचेकडे डोळे वटारून बघतो सार्जंट जातो. नारभट ते फुल घेतो...पहातो)

नारभट : बामण बिघडले म्हणतो. त्या पाखंड्याचा जयजयकार करतो. सहन होत नाही. ऐकवत नाही. आता एकच विचार. त्या पाखंड्याला वाळीत टाकण्याचा एकच जालीम उपाय आता त्याच न्याय सभेंत घुसणे हा एकच उपाय.

( त्यानंतर हळू हळू अंधार होतो आणि न्यायसभेचे दृष्य दिसू लागते.)

# अंक तिसरा -- प्रवेश तिसरा

(न्यायसभा. न्यायाधिश, धोंडीराम पंडीत, रोडे, नारभट आणि इतर कांही प्रतिष्ठीत मंडळी बसलेली आहेत.)

न्यायाधिश : पंडीत, आणखी किती वाट बघायची ?

धोंडीराम : आज ते कोणत्याही परिस्थितीत आल्याशिवाय रहायचे नाहीत.

नारभट : न्यायाधिश महाराज, त्यानं आजपर्यंत केलेल्या गुन्ह्यांचा, पापांचा आणि पातकांचा समग्र इतिहास मी आपणास सादर केलेला आहे. आणि तो भरभक्कम आहे. तेव्हा त्या बाटग्याची पर्वा न करता, आपण एकतर्फी न्याय देऊ शकता.

न्यायाधिश : कुठल्याही कुळाच्या घरावर, मनमानेल त्या हिशोबानं जप्ती आणण्याइतकं सोपं नाही ते. तसली न्यायालय प्रत्येक सावकाराच्या घरीच असतात, आणि तिथं ते स्वतःच न्यायाधिश असतात. ही न्यायसभा एकतर्फी न्याय कधीच देणार नाही.

नारभट : आजपर्यंत मी पाण्यासारखा पैसा ओतलाय त्याचा कांहीतरी विचार कराल की नाही ?

न्यायाधिश : जो पैसा ओतण्याइतका सवंग करून टाकलात, तो मिळवताना तुमच्या अंगातून घामाचा एकही थेंब बाहेर पडला नसेल, पण न्याय हा पैसा ओतून मिळत नसतो, त्यासाठी गरज असते ती नीर-क्षीर विवेकाची.

नारभट : अहो, समस्त ब्रह्मवृंदानं त्या पाखंड्यावर जे आरोप केलेले आहेत ते सूर्यप्रकाशाइतके सत्य आहेत. मुसलमान आणि किरीस्ताव धार्जिण्या

त्या धर्मबुडव्याला, आपण जर कडक शासन करणार नसाल तर यापुढं ही आपली भातुकलीतली न्यायसभा बंद करा आणि ओंकारेश्वरी जाऊन लघुरुद्र करीत बसा.

धोंडीराम : सावकार, जोतिरावांचा जनतेनं महात्मा म्हणून गौरव केलाय तरीही अजून आपण त्यांना पाखंडी आणि धर्मबुडवा म्हणता ? तुमच्या बुद्धीची कीव करावीशी वाटते आम्हाला.

नारभट : गप्प बैस, तुझ्यासारख्या धोंड्याला, त्या म्हसोबानं बनारसी शेंदूर फासून देव बनवला असला तरी कुठल्याही देवळाच्या गाभाऱ्यात तुला स्थान मिळणार नाही. नावामागे पंडीत ही उपाधी लावून कितीही वल्गना केल्यास तरी कुत्र्याच्या भुंकण्याइतकीच किंमत देऊ आम्ही त्याला. हं ! ब्राह्मणांशी बरोबरी करतोय.

रोडे : सावकार, नुसता ब्राह्मणकुळात जन्म घेऊन, :कुठलीही कसाबकरणी केली तरी ती धुतली जाईल हा भ्रम आता तरी काढून टाका. तुमचं पितळ उघडं पाडायला हा रोडे मांग अर्ध्या रात्री तयार आहे. न्यायाधिश महाराज, आपण परवानगी देत असाल ...

न्यायाधिश : सावकार, कांचेच्या घरात रहाणारांनी दुसऱ्याच्या घरावर कधीही दगड फेकू नयेत. धोंडीराम कुंभार आणि रोडे मांग हे आता पूर्वीचे राहिलेले नाहीत, हे तुमच्याही अंतर्मनाला पटलेलं आहे, मग हा त्रागा कशासाठी करताहात ?

नारभट : ज्याना आपल्या जातीची आणि धर्माची चाड उरलेली नाही, ते जर नुसताच पोटभरू न्याय देणार असतील तर आमच्यासारख्या धर्माभिमानी प्रतिष्ठिताना त्रागाच करावा लागणार.

न्यायाधिश . आपण सरळ–सरळ आमच्यावर वार करता आहात हे आमच्या लक्षात आलंय, पण लक्षात ठेवा, आमच्या हातून आमच्या जातीला आणि धर्माला लांछन लावील असं एकही कृत्यं घडलेलं नाही.

नारभट : आणि आम्ही ! जशी काय सकाळ संध्याकाळ, सगळी लांछनास्पद कृत्यंच करतो आहोत. उदाहरणादाखल सांगता का त्यातली एक-दोन ?

न्यायाधिश : एक-दोनच का ? असंख्य आहेत. ऐकायची तयारी आहे तुमची ?

नारभट : पैसेवाल्यांच्या डोळ्यातलं कुसळ शोधून काढण्यातच दरिद्री माणसं आनंद मानित असतात, का तर ते स्वत: निष्कांचन असतात.

न्यायाधिश : त्याच पैशाच्या जोरावर, एखाद्याची हत्या करण्याचा घाट घालणं हे कृत्य कोणत्या शिष्टसंमत प्रकारात बसवता आपण ?

नारभट : आपल्याला काय म्हणायचं आहे ?

न्यायाधिश : आपण विसरला असाल पण 'न्यायदेवतेच्या स्मरणातून कोणतीही गोष्ट सुटूं शकत नाही. कारण तिनं डोळे उघडे ठेवून सगळं पाहिलेलं असतं. बत्तीस वर्षांपूर्वी रोडे आणि धोंडीराम याना एक-एक हजार रुपये द्यायचे कबूल करून, आपण त्यांना जोतिराव फुल्यांचा वध करायला सांगितला होतात की नाही ?

नारभट : मांग आणि रामोशांनी पोटापाण्यासाठी आजपर्यंत असंख्य खून केलेत, दरोडे घातलेत ते काय त्याना कोणी त्यांच्या त्या मेहनतीचा मोबदला कबूल केला होता म्हणून ? अहो तो त्यांचा धंदाच आहे.

न्यायाधिश : पण आपण त्यांना हत्यारं सुद्धा पुरवली होतीत. हैबती, आण त्या तलवारी आणि ठेव त्यांच्या पुढं (तो तलवारी आणून पुढं ठेवतो.) बघा, नीट निरखून बघा. (नारभट जाऊन तलवारी न्याहाळतो) कोणाचं नाव आहे ? काय लिहीलंय् त्यांच्यावर ?

नारभट : "विठोजी पाटील यांस, श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांजकडून खास बहुमानाप्रित्यर्थ दिल्ले असे." याच्याशी माझा काय संबंध ?

न्यायाधिश : याला ओळखता ना तुम्ही ?

नारभट : हो ! तुमचा द्वारपालच ना हा, हैबती ?

न्यायाधिश : होय. हैबती, हैबती पाटील, ज्याच्या आई-बापांना तुमच्या तिर्थरूपांनी कर्ज वसुली न झाल्यामुळे सावकारीच्या कचाटयात पकडून, सध्या तुम्ही रहात असलेल्या घराच्या पायात तोंडात तेल आणि शेंदूर घालून जिवंत पुरलं, त्या दोघांचा हा मोठा मुलगा. आणि त्यावेळी त्यांच्या घरातल्या ज्या सगळ्या पिढीजात वस्तू तुमच्या घरात आल्या त्यातल्याच या दोन तलवारी आणि हे त्या विषयीचे कागदपत्र, घ्या स्वत:च्या डोळ्यांनी वाचा.

(नारभट ते बघतो आणि मान खाली घालतो.)

रोडे : काय सावकार ? रामोशी आणि मांगाच्या हातात, ज्ञान भांडाराच्या किल्ल्या मिळाल्या म्हणजे ते कसा पद्धतशीर दरोडा घालतात, हे तुमच्या लक्षांत आलंच असेल.

धोंडीराम : रोडे, मेलेल्याला मारण्यात कांही अर्थ नाही. आपण आपलं कर्तव्य पार पाडलंय. ज्या अर्थी ते गप्प आहेत त्या अर्थी त्याना कळून चुकलंय की...

नारभट : मूर्खासारखं बडबडूं नकोस, हे, हे सगळं तुम्ही दोघांनी माझ्या विरूद्ध रचलेलं कुभांड आहे आणि हा. हा...हंबती आणि स्वतः न्यायाधिश-सुद्धा त्यात सामील आहेत.

न्यायाधिश : नारभट, आपण शुद्धीवर आहात ना ?

रोडे : आणि नसले तरी जोतिराव आल्यावर एकसमयावच्छेदेकरून शुद्धीवर येतील ते, काय सावकार ?

नारभट : तुझा तो जोत्या येऊ दे नाहीतर त्याचा बाप येऊ दे...

रोडे : चला, इतक्या वर्षांनी कां होईना तुम्ही त्यांचं नाव घेतलत. आता काही तुमची धडगत नाही.

धोंडीराम : रातकिड्यानं ज्योतीवर झडप घातली खरी, आता बघूया काय होतं ते.

न्यायाधिश : जोतिबांच्या हत्येचा आरोप आम्ही साक्षी पुराव्यानिशी केलेला आहे. आता डोकं ठिकाणावर ठेऊन, तुमच्यावर ठेवलेला दुसरा आरोप ऐका.

नारभट : तक्रारी आणि आरोप करायला आलेल्या माणसावर उलटे आरोप करण्याची पद्धत माझ्या आयुष्यात मी प्रथमच पहातोय.

धोंडीराम : त्याचंही कारण उघड आहे, उंदरानी सर्पाचा पेटारा कुरतडण्याचा प्रयत्न केला तर त्याच्या नशीबाला काय येईल हे मी तरी आपल्याला सांगण्याची गरज नाही.

न्यायाधिश : जोतिरावांच्या विरूद्ध आजपर्यंत तुम्ही जशा तक्रारी केल्यात तशा तुमच्याबद्दलही अनेक तक्रारी आमच्याकडे आलेल्या आहेत. पण त्यातल्या जोतिबांच्या संदर्भातल्या ज्या कांही आहेत त्याचाच आम्ही विचार करणार आहोत. सावित्रीबाई फुले यांना शाळेच्या रस्त्यावर गाठून त्यांच्या अंगावर चिखल फेकणं, आवांच्य शिव्या देणं...

नारभट : ते काम त्या वामन भटाच्या बैलांचं आहे.

न्यायाधिश : पण वामन भटाला तुम्हीच बाळगलेला आहात ना? लहूजी वस्तादांच्या व्यायामशाळेला नेस्तनाबूत करण्यासाठीच तुम्ही त्याला व्यायामशाळा काढून दिलेली आहे ना? आपल्या जमाखर्चात दरमहा पांच हजार रुपये आपण खर्ची घालता त्या बैलांच्या दाणावैरणीसाठी. या बघा वह्या. (वह्या दाखवतात) असे बरेच आरोप आम्ही तुमच्यावर ठेवणार आहोत. पण या सगळ्यावर ताण करणारा आणि ब्राह्मण जातीला काळीमा लावणारा गुन्हा, पंचवीस वर्षांपूर्वी तुम्ही केलेला आहे तो ऐका. (न्यायाधिश बोलत असतात. मागील भागात दृष्य दिसत असते) ती एक बालविधवा होती. सतीची चाल बंद झाल्यामुळे आणि केशवपनाला प्रतिष्ठीतांकडून विरोध झाल्यामुळे सासर आणि माहेरच्या लोकांनी तिला घराच्या बाहेर हाकलून दिलं. ती बिचारी एका देवळाच्या पडवीत कसेतरी आपले दिवस कंठीत होती. (देवळाच्या दृश्यात एक स्त्री दिसते व पुढील सर्व दृश्याला सुरवात होते) देवळाचा पुजारी तुमचा मिंधा असल्यामुळे आणि त्याला भांगेचं व्यसन असल्यामुळे तो तुमचं कोणतही काम करायला एका पायावर तयार असे. जेव्हा तुम्ही तिथं पोचलात (दृश्यात नारभट दिसू लागतो) तेव्हा तो आणि तुम्ही स्वतःही नशेतच होतात. तुम्ही त्याचा हात ओला केलात आणि त्याने त्या मुलीला तुमच्या स्वाधीन केली. तुम्ही तिच्यावर पाशवी बलात्कार केलात आणि तिथून चालते झालात. (पुन्हा न्यायसभा दिसते व न्यायाधिश बोलत असतात.) कोण होती ती? गप्प कां झालात सांगा ना? तुम्ही तिच्या माथी मारलेलं ओझं, जोतिराव आणि सावित्रीबाईंनी सांभाळलं. त्या मुलाचा चेहरा तुमच्या चेहऱ्याशी मिळताजुळता आहे. पण वृत्ती आणि वागणूक या मायबापांची आहे.

नारभट : ह! हे सुद्धा तुमचं एक तर्कट आहे. पण आपण अगदी, घटना चक्षूर्वेसत्यम् पाहिल्यासारखी सांगता.

(हैबती उसळतो)

हैबती : अरं चांडाळा, समदं करून सवरून खाका-बगला वर करतोस? मी

सवता, माज्या डोळ्यानी बगीतलंय तुझं त्ये कर्म. त्या वक्ती मी आनि माजा भाव, दौलती, देवळाच्या पायरीवर बसून लोकांचे जोडे सांभाळीत होतो. हरीपंत चिपळूणकर सावकारानी आमास्नी आन्नाला लावलं. दौलती त्यांच्याकडं हाये. आनि मी हित. आमच्या आई-बापास्नी जितं गाडनाऱ्याची आवलाद तू. त्या वक्ती जर मी तुला दिसलो असतो तर माजंबी तू त्येच केलं असतसं या भितीनं मी आंग चोरून दिपमाळंच्या मागं उभा होतो.

न्यायाधिश : झालं समाधान ? आता तर हे तर्कट नाही ना ? नारभट, त्या पोरीनं तुमचा काय अपराध केला होता ? कसली ही अमानुष विषय वासना ! स्वतःला उच्चवर्णीय आणि भूदेव म्हणवून घेणारे ब्राह्मण ही असली अधम कृत्यं करायला लागले, आणि त्या विरूद्ध जोतिबा-सारख्या एखाद्यानं दंड थोपटले, तर त्याच्या विरूद्ध तुम्ही कितीही तक्रारी केल्यात तरी परमेश्वराच्या न्यायालयातसुद्धा तुम्हाला न्याय मिळणार नाही. हे माझं शेवटचं न्यायदान आहे. आणि म्हणूनच मी तुमच्यावर जे जे आरोप ठेवलेत ते साक्षी पुराव्यानिशी ठेवलेले आहेत. आज ना उद्या तुमचं मतपरिवर्तन होईल असं मला वाटत होतं, शिवाय तुम्ही प्रतिष्ठित, अम्मलदार शिवाय आमचे ज्ञातीबंधू, आम्ही परमोच्च बिंदूपर्यंत वाट पाहिली. पण आज त्याची परमावधी झाली. तेव्हा या तुमच्या अपराधाबद्दल ही न्यायसभा तुम्हाला...
(जोतिबा व सावित्रीबाई येतात. सावित्रीबाईच्या हातात एक डबा आहे.)

जोतिबा : थांबा. न्यायाधिश महाराज, सावकारांना शिक्षा देऊ नका. आता ते नुसतेच नावाचे सावकार उरलेले आहेत. मला जमीनदोस्त करण्या-साठी त्यांनी आपली सगळी पिढीजात कमाई खर्ची घातलेली आहे. आता त्याचं राहत घर तेवढं त्यांच्या मालकीचं उरलय, तेही त्यांनी विकू नये किंवा गहाण टाकू नये यासाठी मी इथं आलो आहे. मी आणि माझ्या पत्नीनं ज्या पोटतिडीकेनं हाती घेतलेलं कार्य चालवलं त्याच हिरीरीनं नारभटानीसुद्धा आपलं विरोध कार्य चालवलं होतं. निर्मिकानं मला यशवंत केलं, नारभटांना त्यानी विचारवंत करावं एवढीच माझी त्याला प्रार्थना आहे.

न्यायाधिश : जोतिराव, आपल्या मनाच्या मोठेपणाची कल्पना आहे आम्हाला. पण या पशुतूल्य प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी ..

जोतिबा : न्यायाधिश महाराज, खून करणाऱ्याला फाशीची शिक्षा होते पण तरी देखील खून व्हायचे बंद झालेले नाहीत. पुरातन प्रवृत्तित बदल घडवायचा असेल तर पुढच्या पिढीनं मागच्या पिढ्यांनी केलेल्या चुका दुरुस्त करायला हव्यात. आपण झाड लावायचं ते पुढच्या पिढ्यांना त्याची फळं चाखता यावीत या उद्देशानं. त्यांना शिक्षाच द्यायची असली तर एकचं द्या. यापुढं त्यांनी सद्वर्तनानं राहून आपलं गेलेलं सगळ वैभव परत मिळवीन अशी कबुलायत आपणास लिहून द्यावी आणि त्याप्रमाणे वर्तणूक ठेवावी.

नारभट : जोतिबा ! क्षमा करा, पण आपण ब्राह्मणद्वेष्टे आहात हा माझा गैरसमज होता म्हणून...

जोतिबा : नारभट, मी जर ब्राह्मणद्वेष्टा असतो तर सदाशिव गोवंडे, मोरू वाळवेकर, सखाराम परांजपे हे माझे बालमित्र मला केव्हाच सोडून गेले असते. विष्णूशास्त्रींनी माझं शुद्धलेखन तपासलं पण त्यांच्या तिर्थरूपांनी कृष्णशास्त्र्यांनी, शुद्ध मनानं प्रेमच केलं माझ्यावर. टिळक, आगरकर सुटल्यानंतर मला त्यांची मिरवणूक काढावी असं वाटलं ते ब्राह्मणद्वेषामुळे नव्हे. माझा वाद ब्राह्मणांच्या विरुद्ध नसून ब्राह्मण्याचा अतिरेक करणाऱ्या आणि शूद्रांना शूद्र म्हणून पायाखाली तुडविणाऱ्या प्रवृत्तिशी आहे. या प्रवृत्तिशी दोन हात करण्यासाठीच त्या निर्मिकानं मला उभं केलंय आणि त्याच्याच आज्ञेनं यापुढंही मी माझं कार्य चालूच ठेवणार आहे. मी इथं येऊन माझं निवेदन सादर करावं ही आपली इच्छा धोंडीराम आणि रोडेनी वेळोवेळी सांगितली पण इच्छा असूनही मला येता आलं नाही.

न्यायाधिश : जोतिराव, आपण तयार केलेले आपले दोघे प्रतिनिधी आपली बाजू इतकी प्रभावशीर मांडत की...

नारभट : हे मलाही मान्य करावं लागेल. जोतिरावं, जितकी वर्षं तुमच्या विरोधात उभा राहिलो तितकी वर्षे जर तुमच्या सहवासात राहिलो असतो तर माझ्याही आयुष्याचं सोनं झालं असतं.

जोतिबा : नारभट, सोन्यासारख्या मनुष्यजन्माची उच्च आणि नीच हे भेद करून आपणच माती करीत असतो. " नानावरन गाय । एक रंग है दुध । तुम कैसे बम्मन । हम कैसे सूद । " असं कबीरानं म्हटलंय ते उगाच नाही. झाडाच्या प्रत्येक पानाला सूर्य किरणाचा लाभ होतो तर मग मानवी समाजात अशी दयनीय अवस्था का ? सावित्री, दे तो डबा (घेतात) नारभट, तुम्ही .आपल्या सौभाग्यवतीचे दागिने हरीपंत चिपळूणकरांकडे गहाण टाकले होतेत. तुमच्या विरोधाची जिद्द वाखाणण्यासारखी आहे. पण सावित्री आणि तुमची पत्नी या दोघी बाल मैत्रिणी असल्यामुळे तिच्या मनाला ते पटेना, म्हणून तिनं आजपर्यंत साठविलेले पैसे सावकारांना देऊन ते सोडवून आणले. घ्या, सांभाळा हे स्त्रीधन. घरातल्या लक्ष्मीला नाराज करून बाहेर कितीही विरश्री दाखवली तरी ती कवडी मोलाची असते हे लक्षात ठेवा.

नारभट : (दोघांच्या पाया पडतो) जोतिबा–सावित्रीबाई, तुम्ही दोघं खरो-खरच मायबाप आहात. मला क्षमा करा.

(जोतिबा आणि सावित्रीबाई यांच्यावर प्रकाश पडलेला असताना हळू हळू पडदा पडतो व भैरवीचे स्वर ऐकू येतात.)

स मा प्त

[illegible]
क्र. २०६५८ नों. दि ..............
वि. ....जा.रु.... क्र. २१/१२/५८ ..............

IRBK-0120658